नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

१९६९ - जाने, जुलै, ऑग, ऑ[illegible]
नो, डि - ८ अंक

१९७० - जाने मा - १ अंक

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

जून-जुलै १९७९
ज्येष्ठ-आषाढ, १९०१

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये) (वर्ष ३५, अंक ३/४

संपादकीय

प्रा. बा. मा. दाभाडे यांचे निधन

प्रा. बाळकृष्ण मार्तण्ड दाभाडे या कलाभिज्ञ मराठी साहित्यिकाचे दि. २२ मे १९७९ रोजी कोल्हापूर येथे निधन झाले. त्यांचा जन्म औंध येथे दि. ६ ऑगस्ट १९०९ रोजी झाला होता. मुंबई विद्यापीठाची एम. ए. परीक्षा मराठी व संस्कृत हे विषय घेऊन १९४५ साली उत्तीर्ण झाल्यावर प्रा. दाभाडे यांचे जुन्या धार आणि ग्वाल्हेर संस्थानात व मध्यप्रदेशाच्या निरनिराळया भागांमध्ये नोकरीकरिता बरीच वर्षे वास्तव्य होते. सेवानिवृत्तीनंतर नागपुरात स्थायिक होऊन त्यांनी विदर्भातील संशोधनाला वाहून घेतले होते. प्रा. दाभाडे यांचा मराठी व संस्कृत वाङमयाच्या जोडीलाच चित्र, शिल्प, संगीत आदी विविध कलांचा चांगला व्यासंग होता. त्यांनी मोठ्या प्रयासाने जमविलेला दुर्मिळ चित्रे, शिल्पे, नाणी व हस्तलिखिते यांचा बराच मोठा संग्रह असून संशोधकांना अभ्यासाच्या दृष्टीने तो मोलाचा वाटेल. प्रा. दाभाडे यांच्या एकंदर साहित्यनिर्मिती-ची कल्पना वाचकांना अन्यत्र दिलेल्या सूचीवरून येईल. डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी आपल्या या थोर दिवंगत सुहृदाच्या जीवनकार्याचा लेखरूपाने करून दिलेला हृद्य परिचय या, अंकात मुद्दामच प्रसिद्ध करीत आहो. कै. दाभाडे यांचे अप्रकाशित लिखाण जतन करून ते प्रसिद्ध होण्याची व्यवस्था करायला हवी.

प्रा. दाभाडे यांच्या आत्म्याला वि. सा. संघाची विनम्र आदरांजली.

सव्यसाची साहित्यिक श्री. रा. टिकेकर दिवंगत झाले

मराठीतील एक नामवंत लेखक श्रीपाद रामचंद्र टिकेकर यांचे त्यांच्या वयाच्या ७८ व्या वर्षी मुंबई येथे दि. १३ जून १९७९ रोजी देहावसान झाले. श्री. टिकेकर हे पत्रकार, टीकाकार, इतिहासाचे अभ्यासक व व्यासंगी वक्ते म्हणून प्रसिद्ध होते. 'केसरी'चे प्रवासी प्रतिनिधी या नात्याने त्यांनी संपादन केलेले विविध विदारक अनुभव 'मुसलमानी मुलुखातील मुशाफरी' आणि 'ब्रह्मी वंडाचे पुराण' या त्यांच्या ग्रंथांत शब्दबद्ध झाले आहेत. 'लोकहितवादीची शतपत्रे' आणि 'श्यामकांतची पत्रे' ही त्यांची संपादने चिकित्सकांच्या पसंतीला उतरली आहेत. श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या सहकार्याने श्री. टिकेकर यांनी लिहिलेला 'आजकालचा महाराष्ट्र' हा एक उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ मानला जातो. टिकेकरांच्या अमृत महोत्सव प्रसंगी जो 'मुशाफिर' या नावाचा गौरवग्रंथ प्रसिद्ध करण्यात आला त्यात टिकेकरांच्या विविध क्षेत्रांतील कार्याचे मूल्यमापन करणारे लेख ज्याप्रमाणे मराठीतून त्याचप्रमाणे इंग्रजीतूनही प्रसिद्ध झाले आहेत. यावरून टिकेकरांचे सव्यसाचित्व आणि अमाप लोकप्रियता प्रत्ययाला येते. अशा या विचक्षण वाङ्मयसेवकाला वि. सा. संघाची मनःपूर्वक श्रद्धांजली.

अंतरंग

पुढे संशोधन करूनही मिळणार नाही असा संशोधक प्रा. बाळकृष्ण दाभाडे

/ गोरक्ष देगलूरकर

ओढून ताणून संशोधनाचे चंद्रबळ आणणाऱ्या आणि बढतीसंबंधीच्या अटी शिथिल होताच संशोधनाची ऊर्मी ढेकळाप्रमाणे विरघळून जाऊ देणाऱ्यांच्या या काळात अयाचितपणे व निष्कामपणे संशोधनकार्य अव्याहतपणे करीत असणारे प्रा. बाळकृष्णपंत उठून दिसतात. तनाची वा धनाची तमा न बाळगता अंगीकृत कार्यात स्वतःला झोकून देणाऱ्याच्या पिढीचे शिलेदार होते प्रा. बाळकृष्ण दाभाडे. आताच्यासारखा अेनकेन प्रकारेण पीएच्. डी. मिळवून विद्वान म्हणून मिरवण्याचा त्यांचा काळ नव्हता. संशोधनवृत्ती हाडीमासी खिळलेली असली तरच व्यासंगी मनुष्य तिकडे वळत असे. बाबासाहेब संशोधनाकडे वळले तो त्यासंबंधीचा ध्यास उरी होता म्हणून. संशोधनाची उबळ त्यांना कधी येत नसे. संथ वाहणाऱ्या कृष्णामाईच्या काठी आयुष्याचा प्रारंभ करणाऱ्या या विद्वानाचे संशोधनकार्यही अव्याहतपणे, संथपणे चालू होते.

काही मंडळी वंशसातत्य राहावे म्हणून धडपडत असतात, तर काही जण 'नावा'मागे असतात. बाबासाहेबांची तळमळ होती ती संशोधनवृत्ती कुटुंबात टिकावी यासाठी. ज्याची दोन्ही मुले पीएच्. डी. झालेली असा उमदा गृहस्थ मजकडे आला मुलीला–चि. ऋताला घेऊन आणि विषय निघाला तिच्या संशोधनविषयासंबंधी. 'आधी वर संशोधन करा, हे संशोधन काय होत राहाते' हे माझे म्हणणे व संशोधनाला मी दुय्यम स्थान देणे त्यांना रुचले नाही. ते विव्हल झाले, म्हणाले "माझ्या वडिलांनी मला 'विद्वान हो' असा आशीर्वाद दिला होता; मी मुलांसाठी हीच परंपरा मागे ठेवणार. संशोधनाची धुंदी, त्याचा आनंद हा ब्रह्मानंद सहोदरच मी मानतो, तो मुलांना मिळावा ही इच्छा आहे." ऋतासाठी मी जेव्हा बसल्या ठिकाणी संशोधनपर प्रबंध तयार करता येईल असा विषय सुचविला तेव्हा ते मजवर उखडलेच. म्हणाले, "मुलगी म्हणून असा विषय देत असाल तर तसे नको व्हायला. अभ्यासासाठी गावोगावी जावे लागेल, परिश्रम करावे लागले तरी चालेल. मी जाईन तिच्या सोबत. संशोधन स्वान्तःसुखाय असावे तसेच ते पुढीलांना उपयोगी पडणारे असावे; केवळ पीएच्. डी. साटीचे नको." सत्तर वर्षे उलटलेला गृहस्थ हे म्हणतो आहे, त्याचा उत्साह आणि मनाची उभारी या वयातही टिकून आहे याचे मला फार आश्चर्य वाटले.

कै. बाळकृष्ण मार्तण्ड दाभाडे यांचा जन्म ६ ऑगस्ट, १९०९ मध्ये औंध येथे झाला. शिक्षण औंध, पुणे, बडोदे येथे झाले. मराठी व संस्कृत घेऊन ते मुंबई विद्यापीठातून १९४५ साली एम. ए. झाले. पुढे धार व ग्वाल्हेर येथील महाविद्यालयांतून मराठीचे अध्यापन त्यांनी केले. ज्या वयात मनुष्य काव्य करतो व जगतो त्या वयात शशाङ्क या नावाने त्यांनी बरीच रचना केली. मालती (१९३२), शशिकला (१९३५), मरीचिका, कलातरंग व झंकाराचे पडसाद (१९३८-३९) हे ग्रंथ बरेच लोकप्रिय झाले. ते उत्तम प्रकारे गायनही करीत. त्यांच्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिका एच. एम. व्ही. या कंपनीने बाजारात आणल्या होत्या. 'जागिए गोपाल लाल' हे देसकारातले पद, माधव ज्युलियनांच्या 'तेथे चल राणी' या संग्रहातील काही पदे व खमाज मधील 'न मानुंगी न मानुंगी' ही चीज त्याकाळी अनेकांच्या ओठी होती.

हडप्पा (सध्या पाकिस्तानात) येथे विश्वविख्यात पुरातत्त्वज्ञ सर मॉर्टिमर व्हीलर यांच्या मार्गदर्शनाखाली गिरविलेल्या धड्यामुळे बाबासाहेबांना संशोधनाची दिशा मिळाली. संस्कृतचे गाढ अध्ययन व मराठीवरील प्रभुत्व यामुळे त्यांच्या संशोधनपर लेखनाला वजन व लालित्य प्राप्त झाले. 'माझा मराठाची बोल कवतुके' या ज्ञानेश्वर-उक्तीची पोपटपंची न करता त्यांनी शिल्प, चित्र व स्थापत्य

यासंबंधीचे क्लिष्ट संशोधन मराठीत सोपे करून मांडले. भाषेचे लालित्य संशोधनपर लिखाणातही टिकवून त्यासंबंधीच्या साहित्याला त्यांनी सौष्ठव प्राप्त करून दिले.

वुईल डुरांट म्हणतो की कला कधी वाढत नाही, ती तिचे प्रकार बदलत राहते. बाबासाहेबांच्या जीवनाबद्दलही असेच म्हणावे लागते. रसिकता आणि जिज्ञासा हे त्यांचे स्थायी भाव. पूर्वी काव्यात, गाण्यात आणि कीर्तनात रमणारं त्यांचं मन पुढे संशोधनात रमू लागलं. जीवनातील लालित्यापासून संशोधन क्षेत्र दूर मानणाऱ्यांना संशोधनगर्भ लिखाणात लालित्य आणता येते हे त्यांनी दाखवून दिले. रसिकता कोमेजली नाही की जिज्ञासा लोपली नाही. नेहमी टापटीपीने वागणारे, पांढऱ्या स्वच्छ, परीटघडीच्या वेशात राहणारे आणि खादीच्या कपड्यात राहूनही गबाळे नसणारे बाबासाहेब अंतःकरणाने कवीसारखे ऋजूच होते, मनाने उदार होते आणि मानीही तेवढेच होते. दाही दिशा फिरत राहिले ते संशोधनासाठी, द्रव्य अमाप खर्च केले ते व्यासंग परिपुष्ट होईल अशी सामग्री जमवण्यासाठी, आणि याचना केली ती केवळ संदर्भ मिळावेत म्हणून; कारण सारे लिखाण 'ना मूलं लिख्यते किंचित्' याला अनुसरून होते. कुषाणकालापासूनची दुर्मिळ अशी हजारो नाणी जमविली, बाघ येथील लेणीतील चित्रे गोळा केली पण त्यांची प्रदर्शनें केली नाहीत. त्यांचे म्हणणे त्या त्या विषयाच्या तज्ज्ञांनी मजकडे येऊन ती पाहावीत मी घरोघरी का घेऊन हिंडायचे? संशोधनात समझोताही केला नाही. जे सिद्ध झाले ते मांडले. त्याबाबतीत कुणाची तमा बाळगली नाही. सिद्धांत मनाशी मांडून त्यांनी कधी संशोधन केले नसल्यामुळे दिग्गजांशी टक्कर घ्यायला मागेपुढे त्यांनी पाहिले नाही.

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे एवढ्यावर ते थांबले नाहीत, त्यांनी ते वेचलेही उत्तम प्रकारेच. मालमत्ता मुलांच्या नावे ठेवण्याऐवजी त्यांनी आपल्या ग्रंथांचे तीन संच केले आणि त्यावर लिहिले चि. श्रीकांत, चि. खंडेराव, कु. ऋता—ही नावे. डॉ. श्रीकांत यांचा लोकसंग्रह, कलावंत म्हणूनचे नाव यासंबंधी ते तृप्ततेने बोलत. सूनबाई इंग्रजीच्या प्राध्यापिका झाल्याचा आनंद ओसंडताना त्यांना मी पाहिले आहे.

महालक्ष्मीच्या महापूजेला उपस्थित राहाता यावे म्हणून शुचिर्भूत होऊन निघालेले बाबासाहेब पूजा बांधायला वर निघून गेले तो २२ मे, १९७९ चा दिवस मनात घर करून राहिलाय. माझा सुहृद त्या दिवशी काळाने दूर नेला. संशोधन करताना संशोधन विषयाशी इतके तद्रूप कोणी झालेले मला माहीत नाही. कदाचित 'याच साठी केला होता अट्टाहास! शेवटचा दिन गोड व्हावा' ही बाबासाहेबांच्या मनातील इच्छा देवी जगदंबेने ऐकली असावी. कै. बाबासाहेबांच्या आत्म्यास वंदन!

प्रा. बा. मा. दाभाडे यांची साहित्यसंपदा
(प्रकाशित ग्रंथ)

१. भारतीय चित्रकला; शके १८५६
२. मालती (काव्यसंग्रह), १९३२
३. शशिकला (नाटिका), शके १८५६
४. मरीचिका (गद्यकाव्य), १९३२
५. कलातरंग (निबंध), १९३८
६. झंकाराचे पडसाद (निबंध), १९३९
७. वर्तिका (गद्यकाव्य), १९३८
८. दीपिका (नाटक), (?)
९. तरंग (गुजगोष्टी), १९४०
१०. आविष्कार (गद्यकाव्य), १९४४
११. त्याग (नाटिका), शके १८५७
१२. विद्यामंदिरात (निबंध), शके १८६५
१३. भारतीय आदर्श (चरित्रसंग्रह), १९४७
१४. छाया आणि प्रकाश (गद्यकाव्य), १९५२
१५. कलाविमर्श (निबंध), शके १८८१
१६. कलासाधना (निबंध), १९६१
१७. कविवर तान्हाजीकृत अश्वपरीक्षा (संपादित), शके १८९१
१८. मोगलांवर मात (पोवाडा), १९६२
१९. सौंदर्याच्या शोधात (निबंध), १९७१
२०. बाघच्या रंगमहालात, शके १८९४

२१. गंगेस शिल्पाचार्यांचे अर्घ्य, शके १८९४
२२. अक्षरशोध (निबंध), शके १८९५
२३. सरस्वती–वाक्‌देवता (समाज शिक्षण विषयक) १९७८

(अप्रकाशित वाङ्मय)

१. शोधपराग (निबंध)
२. मातीच्या बाहुल्या (स्वभावचित्रे)
३. संस्कृतीची रूपायने (निबंध)
४. संगीतसाधना (निबंध)
५. भारतीय चित्रकला (साहित्य खंड, लक्षण खंड आणि रूपखंड)
६. कला शब्दकोश
७. रामगिरीच्या निमित्ताने (निबंध)
८. चित्रकथी–एक परंपरा (प्रबंध)
९. पराग (स्फुटलेख)
१०. ऊर्मिलेची प्रदीर्घ निद्रा (खंडकाव्य)
११. प्राचीन भारतीय रंगमंच (प्रबंध)

⊕ ⊕ ⊕

साठवण / नीला शर्मा

ऊनही किती चढलंय् दुपारचं
आडोश्यालाच बसू या थोडं.
अशीच आलेय् अंगणाशी तुझ्या
साठवणीला उन्हात टाकायला.
लहानपणी तर किती ग खेळायचो
फुगडी–लंगडी नि आटयापाटया ?
कधी आईचा पाठीत धपाटा
"पडशील ना विहिरीत !"
किती ग वरतीच दिसायचा तळ ?
आजी म्हणायची—–
"करंटया मेल्या !
बुडलात ना एकदा की कळेल सारं"
झालंही खरं !—–
बुडलोच ना आपण ! बुडतही आहोत !!
जाऊ दे झालं
किती ग ऊन डोक्याशी आलं !
हो ग हो,
अन् एकदा तर आपण
लग्नही लावलं तुझं नि अंजूचं.
मीही होते ना साक्षीला साऱ्यात
करवली म्हणून !
अन् कॉलेजला एकदा
माझ्याही वहीतलं नव्या रंगातलं
पत्र तू पाहिलंस.
रागावलीस, चिडीला आलीस,
मला आतल्या गाठीची म्हणालीस,
अन् मी लाजून सांगताच मिस्कील हसलीस,
गळयात ओणवलीस !
खेळच ग सारा,
फाफट पसारा,
'खो' तो 'खो'च
पण उराला बोच !
निघते ग आता.
येकी तूही नक्की अशीच
एखाद्यावेळी
इतर डब्यातल्या साठवणी काढू
ऊन दाखवायला.
खरंच
ऊन किती चढलयं ग बाई !

⊕ ⊕ ⊕

अवत आणि ओढा / दे. व्यं. चौहान

शके १९०० च्या फाल्गुनात विद्यारत्न श्री. वि. भि. कोलते यांनी चिकित्सक पध्दतीने सम्पादिलेले लीळा-चरित्र प्रकाशित झाले. ज्ञानेश्वरी, नामदेव-गाथा आदी ग्रंथांच्या मालिकेत शासकीय साहित्य संस्कृति-मंडळाने हा बहुमोल बृहत् ग्रंथ प्रकाशित केला याबद्दल मराठी अभ्यासू व जनता 'मंडळा'चे व शासनाचे आभारी राहतील. 'लीळाचरित्रात,' तसेच ज्ञानेश्वरीत 'ओढा' शब्द नाही. लीळा-चरित्रात **ओत** पूर्वार्ध ४९७.१, ४९९.२, ५७१.९, उत्तरार्ध ३७३.२ आणि **वोत** पू. ५६७.१२ (पहिली संख्या लीळांची व बिन्दूनंतरची लीळेतील ओळीची. मूळात लीळातील ओळीसाठी संख्यांकन करण्यात आलेले नाही). म्हणजे 'ओढा, प्रवाह' अशी नोंद ८९ पृष्ठांच्या शब्दकोशात केलेली आहे. ज्ञानेश्वरीत ओत शब्दच अनेक वेळा आलेला आहे. शासकीय प्रतीच्या संम्पादकांना या शब्दाचा अर्थ न कळल्याने पूर असा अर्थ अंदाजाने दिलेला आहे. (ज्ञा. १५.३०५). डॉ. कोलते यांनी आपल्य शब्दकोशात व्युत्पत्तीचा प्रपंच केलेला नसल्याने **ओत, वोत** शब्दाची व्युत्पत्ती दिलेली नाही.

भारोपीय भाषाकुलातील ऋग्वेद हा आद्य ग्रंथ. त्याची सूक्ते इ. पूर्व २००० च्या सुमारास लिहिली गेली असे आजचे विद्वान मानतात. ऋग्वेदात अवत हा पुल्लिंगी शब्द दहा वारादा प्रयुक्त झालेला आहे. त्याचा अर्थ स्प्रिंग अर्थात ओढा असा ती. बरो (पाहा-बरो, पृ. १२९) याने दिलेला असला तरी अनेकांनी त्याचा अर्थ विहीर असा दिलेला आहे. मॅक्दोनेल याने विहीर असा दिलेला बिनचूक नव्हे हे आता निश्चयाने म्हणता येते. कारण ऋग्वेदकाली आजच्या अर्थाने विहीर खोदीत असे म्हणता येत नाही. हे पुढील चर्चे-वरून दिसून येईल. अवत म्हणजे ओढा हा अर्थ योग्य आहे. ज्यूल ब्लोक याच्या व्युत्पत्तिनियमा-नुसार, अव-नम-ओणवा, अव-द्रव-ओला या मार्गाने **अवत** याचे **ओत** हे रूप तन्तोतन्त नियमानुसारी आहे

ऋग्वेदात बृहस्पती, गोतम आणि अगस्त्य ऋषी **अवत** म्हणजे **ओढा** या सन्दर्भात उल्लेखिलेले आहेत.

बृहस्पते या परमा परावद्
अत आ ते ऋतस्पृशो नि षेदुः ।
तुभ्यं खाता अवता अद्रिदुग्धा
मध्वः श्चोतन्त्यभितो विरप्शम् ।। ऋ ४.५०.३

अर्थ :–

हे बृहस्पती जे फार मोठे अन्तर आहे, तेथून येऊन, ज्यांना सत्य पाहण्याची स्पृहा आहे ते स्थिर झालेले आहेत. तुझ्यासाठी दगडातून झिरपणारे अवत अर्थात ओढे, ओहळे खणले गेले आहेत. (त्यातून) चहूकडून मधाचे वैपुल्य झिरपत आहे. येथे पर्वतातून झिरपणाऱ्या पाण्याचा खणून ओहळ तयार केल्याचे वर्णन

ऋग्वेद १.१७९.६ ही ऋचा अशी आहे–
अगस्त्यः खणमानः खनित्रैः
प्रजामपत्यं बलमिच्छमानः ।
उभौ वर्णावृषिरुग्रः पुपोष
सत्याः देवेष्वाशिषो जगाम ।। १.१७९.६

अर्थ :–

प्रजा (आणि) अपत्य यांच्यासाठी बल शक्तीची इच्छा बाळगणाऱ्या (व) कुदळींनी खणणाऱ्या अगस्ति ऋषीने आपल्या ठिकाणी दोन प्रकारच्या वागणुकीची जोपासना केली. त्याला देवांकडून सत्य आशीष् प्राप्त झाले.

पहिल्या श्लोकात अवत खणला गेला असे वर्णिले आहे. या श्लोकात अगस्त्याने खनित्र म्हणजे कुदळी वापरल्या असे सांगितले आहे. आणखी एका श्लोकात अवत, औढ दोन प्रकारचे होते असे वर्णन आले आहे.

या आपो दिव्या उत वा स्रवन्ति
खनित्रिमा उत वा याः स्वयंजाः।
समुद्रार्था याः शुचयः पावकास्
ता आपो देवीरिह मामवन्तु ।।
अर्थ :–

स्वच्छ आणि पावन अशा पाण्याचा, जे स्वर्गातून येते किंवा जे वाहाते, जे चाऱ्यांतून (खनित्रिमाः) किंवा आपोआप (स्वयंज) प्रवाहित होते, हेतु समुद्र आहे; ते देवतारूप पाणी येथे आमचे रक्षण करो.

येथे वाहाणाऱ्या ओहळांची दोन उत्पत्तिस्थाने दिसून येतात. तसेच ओहळाचे दोन प्रकार सांगितलेले आहेत; खणून तयार केलेल्या चाऱ्या किंवा स्वयंज, स्वयंभू असे ओहळ.

ऋग्वेदात मरुत् या गणाचे, समूहाचे वर्णन अनेक सूक्तांतून आलेले आहे. मरुत हे रुद्राचे पुत्र आणि इंद्राचे साथीदार आहेत. जणू काय तो ऋग्वेदीय समाजातील लढवय्या वर्ग आहे, असे त्यांचे वर्णन आढळते. या मरुतांनी एक अवत, ओढा, ओहळ खोदल्याचे वर्णन एका श्लोकात (ऋ. १.८५.१०) आलेले आहे. ८५ वे मरुतांचे सूक्त आहे.

ऊर्ध्वं नुनुद्रे ऽ वतं त ओजसा
दादृहाणं चिद् बिभिदुर्वि पर्वतम् ।
धमन्तो वाणं मरुतः सुदानवो
मदे सोमस्य रण्यानि चक्रिरे ।। १०
अर्थ :–

आपल्या शक्तीने त्यांनी अवत अर्थात ओहळ (याची मर्यादा) वरती ढकलला. त्यांनी कठीण असा पर्वतसुध्दा फोडला. सुदात्या अशा मरुतांनी आपले शिंग फुंकीत, सोमाच्या धुंदीत वैभवपूर्ण कार्ये पार पाडली.

अकराव्या या पुढील श्लोकात मरुतांनी वाकडातिकडा (जिह्म) अवत ओहळ तान्हेजलेल्या गोतमासाठी वाढविला, असे म्हटले आहे.

जिह्मं नुनुद्रे ऽ वतं तया दिशा
असिञ्चन्नुत्सं गोतमाय तृष्णजे ।

वरील १० व ११ श्लोकातील अवत शब्दाचे भाषान्तर मॅक्दोनल यांनी (पाहा रीदर पृ. २९) विहीर (well) असे केले आहे. विहीर हा अर्थ योग्य व सन्दर्भालाही सुसंगत नाही. विहिरीची संकल्पना त्याकाळी होती, असे म्हणणे कठीण आहे. मॅक्दोनल यांनी कोशात या शब्दाचा अर्थ स्प्रिंग ओढा, ओहळ असा दिलेला आहे.

लीळाचरित्रातील ओत शब्दाच्या सन्दर्भाचा उल्लेख वरती आलेला आहे. त्यातील एकच लीळा पाहू–

"गोसविंयांसि रामनाथयाच्या वडातील आसन असे उमाइसें ओतापैलाडि उभीं ठाकली: गोसावियांसी दंडवत केलें; गोसावीं थडीए साउमेया बीजे केलें. उमाइसीं वीनवीलें: "जी जी मीं गोसावियांजवळि एइन"; सर्वज्ञे म्हणीतले; "एयोनिया म्हणिजैल तरि एओं एइल;" पृ. ४९७.१)

ज्ञानेश्वरीतील ओत शब्दाच्या प्रयोगाची खालील ओवी (१५.३०५)-

कां कल्पांतिचेयां पाणियां। काइ ओत
भरताति धनंजया। म्हणौनि कैंचि अविक्रिया।
एका मज ।। ५

कलपांताच्या पाण्याने केवळ ओत, ओढच भरतात असे नाही, असे येथे म्हटलेले आहे.

शब्द-व्युत्पत्ती

ऋग्वेदात अव् धातूचे मूलतः दोन अर्थ आहेत. मो. वुइल्यम्स याने एका धातूची नोंद केलेली आहे. या धातूपासून अवन 'रक्षण' शब्द आहे. दुसऱ्या अव् धातूची चर्चा जे. पोकोर्नी यांनी केलेली आहे (पाहा पाकोर्नी पृ.७८). हा भारोपीय शब्द असून त्याचे वैदिक रूप अवतः पुलिल्ङ्गी असून अर्थ निर्झर, ओढा असा आहे. विकसित अर्थ विहीर, हौद असेही नोंदविले आहेत. फिन भाषेत या शब्दाचे रूप अवेन्स असून लातिन भाषेत ते अवेंतीनुस्, अवेन्तिय ओढा अशी आहेत. या अव्-धातूचे भारोपीय अभिकल्पित रूप अवन्तोस असून त्याचा अर्थ झिरपणे, पाझरणे, वाहणे असा आहे. म्हणून अवत याचा मुख्य विशेष झिरपणे, वहाणे आहे. या धातूपासून ऋग्वेदातील अवनि 'नदी, नदीपात्र' युत्पन्न झालेला आहे.

याच सन्दर्भात पोकोर्नी याने भारोपीय वैकल्पिक रूप अवेद–, औद्, उद् 'पाणी' याची चर्चा केली आहे.

या वर्गात वैदिक ओदती 'ओढा', ओद्मन, अवेस्ता अझोद–'पाझरणे' याचा उल्लेख आलेला आहे. याच ठिकाणी उद्नः उदक, उत्स, उद्र, समुद्र यांची नोंद, त्यांचा अर्थ जलसंचय जलाशय', आहे.

ती. बरो याने भारोपीय व्युत्पत्तीची नोंद केलेली आहे (पाहा बरो, पृ. १२९) बरो याने भारोपीय मूळ* अवृत्त आणि अव्न्त असे दोन प्रकारचे होते असे म्हटलेले आहे. परस्पर परिवर्तनीय र्, न्, हे ध्वनी येथे निहित आहेत. त्याने असे म्हटलेले आहे की अवन्ति हे भारतातील देशनाम, लातिन अवेन्ती-नुस् शब्दाच्या धर्तीवर, व्युद्दत झालेले असावे

अवत या शब्दावर (ऋ १.८५.१०) टिप्पणी करीत असताना सायणाचार्यांनी, यास्काने निरुक्तात (३.२३.७) विहीर, कूप यासाठी वापरलेल्या अवट शब्दाची आठवण करून दिली आहे. यास्काच्या काळात इ. स. पूर्व ६०० च्या सुमारास, ओढा वस्तूसाठी अवट शब्द रूढ होता असे आढळते.

गलचह भाषात :

विशेष लक्ष्य गोष्ट ही की अवत 'ओढा' या शब्दाचे उत्तराधिकारी हिन्दुकुश पर्वतराजीच्या वायव्येस नांदणाऱ्या गलचह भाषांत आढळून येतात. अगदी उत्तरेकडील आमू दर्याच्या परिसरातील शुग्नी बोलीत वेद जलसिंचन कालवा Irrigation Channel; याच अर्थाने आमूच्या उगम प्रदेशातील वखी भाषेत वाद याच अर्थाने यिदगा भाषेत वेलिकह वोलो ही रूपे रूढ आहेत. तसेच पश्तो भाषेत वरील अर्थानेच वालह शब्द रूढ असल्याचे दिसून येते. या नोंदी मोर्जन्स्तर्न याने केलेल्या आहेत. (पाहा मोर्जन्स्तर्न, कोश, पृ. ३२). गुलचह भाषांतील वरील शब्दात, नित्याच्या रूढीनुसार, आद्य अ ध्वनीचा लोप झालेला आहे. त ध्वनीचा द किंवा ल बनलेला आहे. विशेष म्हणजे शेतीला जलसिंचन करणाऱ्या या अवत म्हणजे चऱ्या होत. या सन्दर्भात फावडे घेऊन खणणाऱ्या अगस्त्याने प्रजा आणि आपली सनाति यांना शक्ती प्रदान केल्याची (ऋग्वेद १.१७९.६) आठवण व्हावी.

टर्नर याने अवढ व अवत या शब्दांची नोंद केलेली आहे. त्यावरून अवत शब्दाचे पशई या दरद भाषेत अवा 'डबके, छोटा तलाव' शब्द आढळतो. प्राकृतात अवड अवडअ अगड 'विहीर' अगड, अड 'विहीर, विहीरीजवळील जनावरे पाणी पिण्याचा हौद' असे शब्द आढळतात. भोजपुरी भाषेत ओड़ 'खड्डा खळगा' शब्द आहे. सिंहली भाषेत वळ छिद्र खड्डा अशी नोंद आहे. पाली भाषेत आवाट 'खड्डा विहीर' असून मराठीतील आड 'वर्तुळाकार पिण्याच्या पाण्याची छोटी विहीर'-नोंदलेली आहे.

मोलस्वर्थच्या कोशात अनेक दुर्मिळ व उपयुक्त नोंदी आहेत. ओंड, ओंढ (अनुस्वार आगन्तुक) 'खोल पाणी विहीर, डबके, भाताचे शेत', ओढ, ओढा 'जलप्रवाह ओहळ, नदीचे कोरडे किंवा खांडवे पडलेले पात्र', ओहळ (ह ध्वनी आगन्तुक पाहा ओळी) जलप्रवाह, ओढा', ओहळ खोवळ ओहळणे 'झिरपणे' ओळांगर 'झिरपणे', ओळी ओहळी 'झिरपणे' इत्यादी नोंदी अवत, अवट या मुळाची स्मारके होत. मोल्स्वर्थने हाळ 'जनावराला पाणी पिण्यासाठी विहीरी शेजारी बनविलेला हौद.' शब्दाची नोंद केलेली आहे. तो प्राकृतातील याच अर्थाच्या अगड, अड शब्दाचा पुढील विकास होयडर, ल यांचा ळ ध्वनी बनविण्याची प्रवृत्ती पैशाची प्राकृतता विशेष दिसून येते. आद्य अ ध्वनीचा सौरुयीर्थ ह् बनलेला आहे. तसेच उतणे 'उकळणे व भांड्याबाहेर वाहणे', उतू जाणे, उतीव, ओत, ओतणे हे शब्द अवत शब्दाचेच विस्तार होत. उतू शब्दात तापविण्याची घटना जमेस धरून 'द्रवाचे झिरपणे, वाहणे' हीच क्रिया महत्त्वाची असते.

आणखी विस्तार, ओहटणे, ओहट, ओहटी 'समुद्राचे भरतीचे पाणी ओसरणे, परत वाहून जाणे' शब्दसंच अवत, अवट याच्याशी संबन्धित आहे. यात विशिष्ट परिस्थितीत पाण्याचे वाहाणेच असते. मराठीने या अर्थ विशेषालाच या शब्दाने टिपलेले आहे. याचा शब्द विकार औंठणे, औठी या रूपातही दिसतो अर्थ ओहटीच.

समारोप

वैदिक भाषेत आढळणारे अनेकानेक शब्द मध्य आर्य भाषेत (अभिजात संस्कृत, पाली, प्राकृत) लुप्त झालेले असले तरी, अशा शब्दांचा सुगावा

आधुनिक बोली भाषांतून लागतो, या मुद्याची चर्चा व उकल बरो याने आपल्या मौलिक ग्रंथात केलेली आहे (पाहा, बरो पृ. ४६) हाच विचार ग्रिअर्सन याने पिशाच भाषांच्या सर्वेक्षणाच्या प्रास्ताविकात, आणि मोर्जन्स्तर्न याने गलचह भाषांच्या अध्ययनात मांडलेला आहे. वैदिक भाषेचा वारसा घेऊन त्यात अर्थ विकासाची मौलिक भर घालण्याचे कार्य नव्य भारतीय भाषांनी केलेले आहे. अशा क्षेत्रात मराठी भाषेची कामगिरी अक्षुण्ण मार्गाची व मोलाची आहे.

भारेराणी व्यवन्ताच्या इतिहासात मराठीचे आगळे स्थान आम्ही अभ्यासूंपुढे मांडलेले आहे. अवत शब्दाचे मूळ 'ओढा, नदी' अर्थाचे संस्कृत, पाली, प्राकृतादी भाषांत अप्राप्त असले तरी, मूळ अर्थ मराठीत शेप राहावा ही गोष्ट मोठी लक्ष्य व विचारणीय आहे. अवत म्हणजे जलसिंचनाच्या चाऱ्यांशी असलेले ऋग्वेदातल्या अगस्त्याचे साहचर्य, दुसरे महाराष्ट्र व दक्षिणेच्या वसाहती करण्यात अगस्त्य ऋषीचा असलेला संबंध आणि तिसरे म्हणजे ऋग्वेदातलाच शब्द ओढा रूपाने महाराष्ट्रात शेष राहावा या तिन्ही बाबी मराठी भाषिकांचे वेगळेपण सुचविणाऱ्या आहेत की काय, असा प्रश्न निर्माण होतो. याची उकल शक्य आहे का?

संक्षेप व सन्दर्भ

ऋ.–ऋग्वेद संहिता, वै. सं. मण्डळ, पुणे.

ज्ञा.–ज्ञानेश्वरी, शासकीय प्रत, मुंबई, १८८५.

तर्नर–ए कम्पारितिव डिक्शनरी आफ द इन्दो-आर्यन लॅंग्वेजेस आर. एल. तर्नर.

बरो–द संस्कृत लॅंग्वेज, ती बरो लंदन, १९६५.

ब्लोक–ज्यूल ब्लोककृत मराठी भाषेचा विकास, वा. गो. परांजपे, पुणे.

मोर्जन्स्तर्न–इन्दो ईरानियन फ्रान्तिअर लॅंग्वेजेस खण्ड २, आस्लो १९३८.

मोल्स्वर्थ–मराठी इंग्रजी कोश, मुंबई, ३१९७५.

मोवुइल्यम्स–ए संस्कृत इंग्लिश डिक्शनरी, मोनिअर वुइल्यम्स.

लीळाचरित्र–म्हाइंभटकृत लीळाचरित्र, वि. भि. कोलते, मुंबई श. १९००.

वेदिक रीडर–ए वेदिक रीडर, ए. ए. माक्दोनेल, मद्रास १९७६ (१९१७).

⊗ ⊗ ⊗

ससाणे / नंदकुमार शेंडगे

इतके ससाणे त्यांनी कशासाठी ठेवले जवळ ?
एक सोडलाही माझ्यावर;
माझी शिकार होताना आनंदाचा पारा
कसा लखाखतोय त्यांच्या चेहऱ्यावर
एका ससाण्यातच माझा मेंदू संपुष्टात
कमाल !
आणि त्यांच्याजवळ तर इतके ससाणे.
माझं अस्तित्व तर खोदायचं नसेल ना त्यांना ?
त्यांचे हात कसे गोंजारत आहेत ससाण्यांना—
आणि ससाण्यांचे लालबुंद डोळे अस्सल शिकारी कुत्र्यासारखे.
कसे लोळ बाहेर पडताहेत त्यातून;
माझ्या कवितेवर तर घाला घालायचा नाही ना त्यांना ?
वेदनेच्या जंगलातल्या—
अगतिकतेच्या डोहात मी बुडतोय कसा हळू हळू
आणि हे ससाणे एका रेषेतून येतच आहेत पंख फैलावीत.
आभाळ तर त्यांनी केव्हाच व्यापून टाकलंय.
काळ्याभोर सावल्या पसरल्या आहेत सर्वत्र;
मी कुठल्या शब्दांच्या रस्त्यावर उभा राहू
हे जंगल ओलांडून ?
माझ्या अस्तित्वाचे सांगाडे
आता पूर्ण धोक्यात आहेत !

⊕ ⊕ ⊕

उ. रा. गिरी यांची कविता / श्रीकांत तिडके

पहिल्यांदा कवितासंग्रह आणि त्यानंतर त्याची समीक्षा, असे कवितेच्या प्रांतात नेहमी घडते. पण गेली बारा वर्षे भावमधुर कवितांची शिंपण करणाऱ्या उ. रा. गिरी यांची कविता कधी संग्रहबध्द झाली नाही. गेल्या दशकात दलित कविता झपाट्याने आली. पण या संक्रमणाच्या काळात उ. रा. गिरी-सारखे कवी आपल्या कविता रसिकासमोर निष्ठेने सादर करीत राहिलेत. सत्यकथा, नवयुग, किर्लोस्कर, वसंत, प्रतिष्ठान, युगवाणी अशा सगळ्या मासिकांना सजविणारी गिरी यांची कवितापुष्पे कधी काव्यसंग्रहाच्या माळेत गुंफली गेली नाहीत.

व्यवहारी जग आणि आपले स्वप्नविश्व यात महत् अंतर असते. कवीच्या संदर्भात हे अधिक खरे आहे. पण असे असूनही आपले 'स्वप्नविश्व' गिरी यांनी अतर्मनात शाबूत ठेवले आहे.

'मार्गावरून माझ्या
मी एकटा निघालो
डोळ्यात चंद्र जखमी
घेऊन मी निघालो'

या एकटेपणाची खंत गिरी यांच्या कवितेत कुठेच दिसत नाही. 'डोळ्यात चंद्र जखमी' या मर्मभेदी प्रतिमेने त्यांनी अंतर्मनात ठसठसणारी वेदना व्यक्त केली. पण त्या वेदनेचा त्यांच्या कवितेत 'वेद' होतो. त्या वेदनेची सोबत त्यांच्या आयुष्याच्या प्रवासाला आहे. आणि ती पुरेशी आहे. गिरी आपल्या वेदनेचे 'उदात्तीकरण' करीत नाहीत. वेदना, व्यथा हा त्यांच्या कवितेचा आत्मा आहे. आणि म्हणून आपल्या वेदनांना ते 'शब्द' करतात.

ना. धों. महानोर यांनी 'पानात छंद घुमसतात' या कवितेत सुचविले आहे :—अजिंठ्याच्या लेण्या चित्रांकित करणाऱ्या कलावंतांनी आपले सगळे 'स्वप्न भांडार' तिथे मांडले पण आपल्या नावाचा मागमूसही तिथे ठेवला नाही. कोणत्या कलावंताचे ते स्वप्न-भांडार' असेल ? असा प्रश्न महानोर यांना पडला आहे. पण ज्या कलावंतांनी ते 'नंदनवन' निर्माण केले त्यांना प्रसिध्दीची अपेक्षाच नसेल. आपणाला आपले 'क्षितिज' सापडले किनारा गवसला या पूर्ततेच्या आनंदात त्यांना नाव कोरण्याची गरजच वाटली नसेल. गिरी यांना प्रसिध्दीची अपेक्षाच नाही असे म्हणता येणार नाही पण त्याची खंत नाही. 'दिशा' या कवितेत ते म्हणतात 'माझे' असे कुणीच नाही. आपली गाणी ऐकायलाही कुणी नाही. पण तरी त्यांची दिशा, क्षितीज हरवले नाही.

'होतात दिवसरात्री
स्थित्यंतरे ऋतूंची
जिथली तिथेच असते
माझी दिशा शहाणी'

'आपलेपण' शाबूत ठेवून या प्रतिभावंताने आपला धर्म निष्ठेने पाळला म्हणून तर त्यांची 'दिशा' शहाणी आहे.

उ. रा. गिरी यांच्या कवितेत दोन समांतर प्रवाह प्रवाहित असल्याचे वामन इंगळे यांनी 'अस्मितादर्श' (दिवाळी १९७८) मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात म्हटले आहे. आणि त्या आधारेच त्यांनी (१) तीव्र सामाजिक कविता व (२) देखणी भावकविता असे वर्गीकरण केले आहे. उ. रा. गिरी यांच्या कवितेचा चेहरामोहरा स्थूलमानाने असाच आहे. पण जरा बारकाईने पाहिले तर—

'वाऱ्यात दर्द ओली
बंदीश गारव्याची;
लय एक लाजवंती
स्पर्शातुनी बिथरते ।'

आणि पुढे

'घडले तसे न काही
रानात राजवर्खी;
अमिताभ अर्थगर्भा
कविता जिवास सलते.'

उ. रा. गिरी यांच्या कवितेतील हे 'सलणं' मोठे लक्षणीय आहे. ही 'सल', वेदना मध्यवर्ती आहे. गिरी यांच्या आत्मेकेन्द्री भावकवितांमध्ये जशी त्यांची काळीज कापणारी 'सल' दिसते, तशीच ती सामाजिक आशयसंपन्न कवितांतही. त्यांची सामाजिक कविताही जर वेगळी आहे. 'मी' आणि 'समाज' यांमधील तणावच प्रकर्षाने जाणवतो. या कवितांना उपरोधाची धार आहे. वेदनांचा विस्तार, विकासक्रम जसा इंदिरा संतांच्या शेला, मृगजळ, मेंदी अशा कवितांतून दिसतो, तसा विकासक्रम गिरी यांच्या कवितांचा प्रकाशनकाळ लक्षात घेतला की प्रत्ययास येतो.

(२)

वालकवीसारखी झपाटून टाकणारी 'वेदना' गिरी यांच्या कवितेत आहे. पण ही सलणारी वेदना जोपासत असताना त्यांच्या मनातील 'सर्जनशीलता' कोळपून गेली नाही. माणुसकीचा, सृजनाचा गहिवर त्यांच्या कवितेला येतोच.

'वार लागुनी जरि जिव्हारी
मुर्च्छित शकलित स्वप्न जगाचे
दैन्याच्या पंकात पाशवी
रुतलेले रथचक्र युगाचे
तरी 'उद्याची हाक' शुभंकर
दूर दिगंती घुमते आहे !
. . . अजून माणूस 'माणूस' आहे.

'उद्याची हाक' दूर दिगंती घुमते आहे. अशा सुंदर आशांचे लताकुंज त्यांनी आपल्या स्वप्नविश्वात जोपासले आहेत.

गिरी यांनी आपल्या कवितेतील आशय सुंदर आणि समर्पक प्रतिमांनी तोलून धरला आहे. 'प्रतिमा' आणि अलंकार यांत मूलतःच भेद आहे. 'प्रतिमा' या अनुभवातून उमलून आलेल्या असतात. त्यांना अनुभूतीचे परिमाण लाभलेले असते. गिरी यांच्या प्रतिमा अशा अनुभूतीच्या रसात डुंबून निघालेल्या असतात. आणि या प्रतिमांचे वेगळेपण असे की, एकच प्रतिमा अनेक कवितांमध्ये ते वापरतात. पण प्रत्येक वेळी वेगवेगळ्या अनुभूतीचे सूचन ती प्रतिमा करते. 'डोळे' आणि 'चंद्र' या कवितांतील शब्दांच्या भावपूर्ण प्रतिमा गिरी आपल्या कवितांमध्ये बनविताना दिसतात. 'डोळयांत चंद्र जखमी' घेऊन निघालेला हा कवी —

'आणि बुडत चाललेला
एक घननीळ अपार्थिव आशय
डोळयातील कवितेच्या कालिंदी जळात'—

असे सांगून अपार्थिव आशय डोळयातील कवितेच्या कालिंदी जळात बुडवतो. आणि 'डोळे' या प्रतिमेतून एक वेगळा आशय सुचविला जातो. कधी 'डोळयात चंद्र जखमी' घेऊन आलेला कवी डोळयात वासनेचा चंद्र पेटवून येतो—

'नेत्रात शिलगलेला
हा चंद्र वासनेचा
गात्रात जायबंदी
पाऊस वासनेचा' —

आणखी एका कवितेत त्यांनी 'आयुष्य वासनांचा रंगीत पावसाळा' असे म्हटले आहे. या ठिकाणीसुद्धा रंगीत पावसाळयातून वासनेचे केलेले प्रगटीकरण मोठे अचूक आहे. गिरी यांच्या कवितेतील प्रतिमासामर्थ्य जसे लक्षणीय आहे, तसेच कुसुमाग्रजांप्रमाणे त्यांच्या कवितेत भाव-नाटयही आहे. 'मी एकटा निघालो' या कवितेत गौतमाच्या मनोवस्थेचे मोठे वेधक चित्रण गिरी यांनी केले आहे. गौतम सगळं सोडून निघाला आहे. मध्यरात्रीचा शांत समय. सर्व चराचर झोपलेले. 'गौतम' हा 'बुध्द' होण्यासाठी जातोय. त्या महात्म्याच्या अंतःकरणातील या संधिकाळातील वादळी क्षण गिरी ज्या सूचकपणे व्यक्त करतात त्यातच प्रस्तुत भावनाटयगीतांचे सामर्थ्य दडलेले आहे.

'घोटाळले नदीचे
पायात मूक पाणी
डोळयात वाट त्याला
देऊन मी निघालो.

झोपेत हासणाऱ्या
चुंबून राहूलाशी
माझ्या यशोधरेला
सोडून मी निघालो.'

अनुक्रमणिका

गौतमाच्या मनात नेमके असेच वादळी क्षण आले असतील का? की सर्वस्वाचा त्याग करणारा गौतम लौकिकालाच उबगून गेला होता? पण 'गिरींचा गौतम' वेगळा आहे. त्याच्या पायात नदीचे मूक पाणी घोटाळू लागते. तो डोळ्यांतून वाट देऊन पुढे निघतो. सर्व लौकिक सुखाला लाथाडून निघालेला गौतम अशा भावनिक संघर्षाच्या भोवऱ्यात खरंच अडकला असेल का? हा वादाचा प्रश्न आहे. पण कलावंताच्या भूमिकेतून विचार केला की वाटू लागते, 'आकाशाएवढा झालेला तुकोबा' एकदम काही मोठा झालेला नाही. त्याच्या जीवनातील विकासक्रम त्याच्या अभंगांतून स्पष्टपणे दिसतो. त्यांचे अभंग म्हणजे त्यांच्या आध्यात्मिक जीवनातील आत्मोद्‌गारच होत. गौतमाच्या जीवनातही लौकिक आणि अलौकिक विरहाच्या संधिकाळात वावरताना असा संघर्ष निर्माणच झाला नसेल असेही म्हणता येत नाही. गिरी यांचे वहिर्मुख वृत्तीचे भावनाटचगीत वाचकांना अंतर्मुख केल्यावाचून राहत नाही. याही कवितेतील प्रतिमा विलक्षण आहेत.

(३)

आपले आयुष्य म्हणजे काय? हा सनातन प्रश्न प्रत्येक संवेदनशील मनाला सतत भेडसावत असतो. 'आयुष्य वेदनांचा खग्रास ठोकताळा' असे गिरींना वाटू लागते. पुन्हा त्यांचे चिंतनशील मन त्यांना अंतर्मुख होऊन सांगू लागते 'आयुष्य वासनेचा रंगीत पावसाळा' आणि शेवटी—

'वीरास विक्रमाची
आयुष्य एक संधी
आयुष्य शंकराचा
तिसरा अजेय डोळा'

आयुष्य म्हणजे नेमके काय? याचे आकर्षण जसे कवीला आहे तसेच आयुष्याच्या एकाकी प्रवासात मर्ढेकरांप्रमाणे झाडावरून सांडणाऱ्या चांदण्याच्या सरीसारखी सहज नाचरी नजर गिरींनाही अपेक्षित आहे. तिच्या अस्तित्वाने, प्रतिक्षेने, मीलनाच्या सुखद क्षणाने व्यापलेल्या कविताही खूप आहेत.

'थोड्याच तू क्षणाची
दातार देवयानी
थोडा अजून प्यासा
माझ्यातला ययाती'।

किंवा

'नाही विसरली रात्र
तुझी अजून कहाणी
माझ्या हिशेवी डोळ्यात
थोडे बेशरम पाणी!'

गिरी यांच्या प्रेमकविताही अशा अनेक अनुभूतींना स्पर्शून जाणाऱ्या आहेत. 'आणि एका रागिणील' अशा कविता रेडिओवरूनही ध्वनिमुद्रित झालेल्या आहेत. त्यांच्या प्रेमकवितांवरही खूप लिहिता येईल. तूर्त इतकेच पुरे.

(४)

याआधी निर्देशित केल्याप्रमाणे 'मी' आणि 'समाज' यांमधील परस्परसंबंधाचा विचारही गिरी यांच्या कवितेत आहे. प्रत्येक प्रेमकवितेला त्या-त्या काळाचे सामाजिक संदर्भ असतात. माधव जूलियनापासून तो आजच्या चित्रे यांच्या पिढीतील प्रेमकवींच्या प्रेमकवितांवर बदलत्या सामाजिक स्थित्यंतराच्या सावल्या पडलेल्या दिसतात. गिरी यांच्या कवितेजवळ सामाजिक जाण आहे. पण त्यांचा 'सोशल ॲप्रोच' उत्स्फूर्त नाही.

'आग' या सामाजिक विडंबनपर कवितेत—
'उरापोटातली जागवावी आग
मग अग्निराग उगारावा'

आणि शेवटी

'आता आग तू-मी
तुम्ही-आम्ही आग
जाळावया नाग
साम्यसत्री! (आग)

याशिवाय 'वाढा भाकर बाई', 'गर्दीचे गीत' अशासारख्या कविता आणि 'मनोहर', 'मराठा' इत्यादींतून प्रकाशित झालेल्या वात्रटिका सामाजिक उपहास स्पष्ट करणाऱ्या आहेत.

'उद्याच्या नकाशावरून
फुलांच्या नद्या वाहू लागतील
फुलांचे समुद्र साचतील
आपली मुले फुलांच्या पावसात नाचतील !'
(फुलांच्या नद्या)

अशा कवितांतून उद्याच्या समाजाचे स्वप्नचित्रही गिरी यांनी रेखाटले आहे. मात्र गिरी यांची सामाजिक आशय व्यक्त करणारी कविता सामाजिक वास्तवाचे यथार्थ भान ठेवणारी आहे असे म्हणता येणार नाही. पण रोम जळत असताना हाती 'पियानो' घेऊन बसलेल्या निरोगी वृत्ती त्यांची नाही. हे मात्र त्याच्या कवितेवरून स्पष्ट होते.

(५)

'पियानो' या नावाने गिरी यांचा कवितासंग्रह प्रकाशित करण्याचे कित्येक दिवसांचे ठरले आहे. त्यांच्या कवितासंग्रहाला हे नाव यथार्थच राहील. त्याची कविता डंका, तुतारी नाही. पण समाजातील पडझडीने अस्वस्थ होणारी, सभोवतालच्या दुःखाने गदगदणारी त्यांची कविता आहे. या कवितेला 'लय' आहे. गेल्या दोन पाच वर्षांत प्रकाशित होत असलेल्या त्यांच्या कविता अधिक अंतर्मुख आणि अस्वस्थ आहेत. 'युगवाणी' मध्ये प्रकाशित झालेल्या 'रेपांचे इलियड' या कवितेचा या संदर्भात विचार करावा लागेल.

'कौमार्याच्या वहीत केव्हा
चिताडलेले काहीबाही
अप्रगल्भ हे हात अहेतुक
करून बसले वेडी घाई
आज परंतु 'त्या' घाईतले
उलगडलेले रेपांचे इलियड
तुझे नवे रेखाटण अधुरे'

बघताना 'शिशिरातील पडझड'-(रेपांचे इलियड) अशा मनस्वी कविता अस्वस्थ करून जातात. गिरी यांच्या कवितांचे आणखी वैशिष्ट्य असे की, त्या वाचत असताना ओठावर रेंगाळू लागतात

स्वतःच्या वासनेकडे 'खय्यामी' तरीही अतिशय सुंदर आणि जबाबदार पध्दतीने पाहण्याची पार्थिव वृत्ती आणि त्या वृत्तीला साजेशी अभिव्यक्ती गिरी यांच्या कवितेला लाभली आहे. 'या कवितेची गेयपूर्ण डिक्शन आणि तिचा एकूण पार्थिव नखरा मला विंधून गेला' असे वामन इंगळे यांनी म्हटले आहे. कुठल्याही रसिकाला असेच वाटावे. इतके सामर्थ्य या कवितेत आहे. आजच्या मुक्तछंदात्मक कवितेच्या युगातही गिरी यांच्या कवितेला भवितव्य आहे कारण आपल्या वेदनेच्या अनुभूतीशी ती प्रामाणिक आहे.

'या एकलेपणाचा
छेडीत मी पियानो
ओठास भैरवीच्या
दंशून जा स्वरांनो.
शब्दात आसवांची
बांधू कशी समाधी ?
व्हा हद्दपार आता
डोळ्यातल्या तळ्यांनो'.

'आसवांची समाधी' शब्दात कशी बांधावी ? असे गिरी यांनी म्हटले असले तरी त्यांनी आपल्या आसवांची, वेदनेची चिर समाधी कवितेच्या रूपाने बांधली आहे. गिरी यांच्या कवितेत दुःख आहे; वेदना आहे. म्हणून तर ती सुंदर आहे. शेलेने म्हटलेच आहे :—

'Our sweetest songs are those that tell us of sadest thought'—

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

स्त्रियांची आत्मचरित्रे : काही विचार / विमल भालेराव

मराठी साहित्यात आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराला महत्वपूर्ण स्थान प्राप्त होत आहे. नाटक, कादंबरी वगैरे वाङ्मय-प्रकारांप्रमाणेच आत्मचरित्र हा वाङ्मय-प्रकार आपल्याकडे इंग्रजी वाङ्मयाशी संबंध आल्यावर खऱ्या अर्थाने रूढ झाला. परंतु त्यापूर्वी आज आत्मचरित्र या नावाने ओळखले जाणारे, आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराशी साधर्म्य दाखविणारे अथवा जवळीक साधणारे लिखाण आपल्याकडे मुळीच नव्हते असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल! प्राचीन काळापासून आत्म-कथनपध्दतीला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसते. संत वाङमयातील नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम व बहिणाबाई यांच्या अभंगात आत्मचरित्रपर उल्लेख आलेले आहेत. परंतु ही आत्मचरित्रे जाणीवपूर्वक लिहिलेली नाहीत. आज आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराचे निकष लावून ती पडताळून पाहता येणार नाहीत.

१८७०-७१ मध्ये लिहिलेले दादोबा पांडुरंग यांचे 'आत्मचरित्र' हे रूढ अर्थाने मराठी वाङमयातील पहिले आत्मचरित्र मानले जाते. स्त्री-वाङमयाचा उगम सहाव्या-सातव्या शतकात ओवी, उखाणे, म्हणी यांसारख्या रूपात दिसत असला तरी रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे पहिले स्त्री-आत्मचरित्र विसाव्या शतकाच्या आरंभी (१९१०) लिहिले गेले. स्त्रियांची आत्म-चरित्रे पुरुषांच्या आत्मचरित्रांच्या तुलनेत संख्येनेही कमी आढळतात. स्त्री-आत्मचरित्रे उशिरा लिहिली जाण्याचे व कमी असण्याचे कारण स्त्रियांच्या वाट्याला आलेली परिस्थिती होय. स्वत:च्या मनोगतांना दुसऱ्याजवळ व्यक्त करण्याची तिला मुभा नव्हती. आतल्या आत कुढणे व कुढत कुढत एक दिवस संपून जाणे हेच तिचे जीवन होते. अशी स्त्री स्वत:चे जीवन शब्दबध्द करून लोकांसमोर येणे अशक्यच होते. परंतु इंग्रजी राजवटीने या स्त्रीचा कायापालट केला. तिची मन:क्रांती घडवून आणली. तिला चालते, बोलते आणि लिहिते केले. १९१० ते १९७५ या कालखंडात एकूण पस्तीस स्त्री-आत्मचरित्रे लिहिलेली आढळतात.

आत्मचरित्रे अनेक हेतूंनी लिहिली जातात. काही आत्मचरित्रे 'स्वान्त:सुखाय' लिहिलेली आढळतात. वेळ जावा, करमणूक व्हावी, आपला पराक्रम दुसऱ्याला सांगून त्याला भारावून टाकावे अशी 'स्व'सुखाची अनेक परिमाणे असू शकतात, आपले दु:ख दुसऱ्यास सांगणे, आत्मशोध घेणे, आत्मस्तोत्र गाणे, स्वत:च्या कृत्यांचा कबुलीजबाब देणे, आपल्या जीवनापासून दुसऱ्यांना काही बोध होईल या बोधवादी हेतूने, म्हातारपणाची जाणीव झाल्यावर स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने—अशा विविध हेतूंनी आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत, लिहिली जात आहेत व लिहिली जाणार आहेत. आत्मचरित्राच्या या सर्वसाधारण हेतूंनी ही स्त्री-आत्मचरित्रे लिहिलेली आहेत. या आत्म-चरित्रांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

एकूण नऊ आत्मचरित्रे पतीच्या निमित्ताने लिहिली गेली आहेत. (१) 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' रमाबाई रानडे (२) 'स्मृति-चित्रे' लक्ष्मीबाई टिळक (३) 'आमची अकरा वर्षे' लीलाबाई पटवर्धन (४) 'स्मृतितरंग' अन्नपूर्णाबाई रानडे (५) 'या सदाशिव' इंदिरा भागवत (६) 'माझा नंद दीप' : लक्ष्मीबाई पटवर्धन (७) 'वेचलेले मणी' रमाबाई केदार (८) 'ढळला रे ढळला दिन सखया' व 'उमटलेली पावले' : : राधाबाई आपटे (९) 'मीच हे सांगितले पाहिजे' शीलवती केतकर—ही बहुतेक आत्मचरित्रे पतीच्या निधनानंतर त्याची स्मृती जागती राहावी, पतीची, अपुरी इच्छा पूर्ण करावी, पतीच्या कर्तृत्वापासून मुला-नातवंडांना बोध व्हावा, पतीसंबंधी जनमान-सात असलेले गैरसमज दूर व्हावे अशा विविध

दृष्टिकोणातून लिहिली गेली आहेत. पुढील आत्मचरित्रे लोकाग्रहास्तव लिहिलेली आढळतात. (१) 'माझी कहाणी' : पार्वतीबाई आठवले (२) 'द्रौपदीची थाळी' गिरिजाबाई केळकर (३) 'स्वरवंदना' ज्योत्स्नाबाई भोळे (४) 'पण ऐकतं कोण?' उषाबाई डांगे (५) 'अश्वत्थाची फुले' : प्रमिलाबाई भालेराव—या आत्मचरित्रांचा लेखन-हेतू परप्रेरित असला तरी या आत्मचरित्रांचे ध्येय 'स्व'प्रतिमा रेखाटणे हेच आहे. पुढील आत्मचरित्रे स्वतःसाठी लिहिलेली आहेत. (१) 'स्मरणसाखळी' कमलाबाई देशपांडे (२) 'माझे पुराण' आनंदीबाई कर्वे (३) 'गेले ते दिवस' सत्यभामाबाई सुखात्मे (४) 'गोदातरंग' सुधा अत्रे (५) 'सांगत्ये ऐका' हंसा वाडकर (६) 'स्मरणमाला' : जानकी फडणीस (७) 'हे गीत जीवनाचे !' सुमती शहा (८) अजून चालतेची वाट !' आनंदीबाई विजापुरे (९) 'स्नेहांकिता' स्नेहप्रभा प्रधान (१०) 'सांजवात आनंदीबाई शिर्के (११) 'चाकोरीबाहेर' गंगूबाई पटवर्धन (१२) 'आंब्याचा टाळा' सुशीलाबाई आठवले. 'आमचा जीवन प्रवास' यशोदाबाई जोशी व 'आमचे कृतार्थ सहजीवन' रुथ हिवाळे ही दोन सहचरित्रे आहेत. 'माझा नाना' ही वेणूबाई आजरेकर यांची पुत्रप्रेमापोटी जन्मलेली आत्मकथा आहे. खालील आत्मचरित्रे आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराची तंत्रविषयक परंपरा मोडणारी आहेत. (१) 'जाऊ मी सिनेमात'? शांता आपटे (२) 'माझी नृत्यसाधना' रोहिणी भाटे (३) 'निशिगंध' मृणालिनी देसाई (४) 'जेव्हा माणूस जागा होतो' : गोदावरी परुळेकर—जन्मापासून आत्मचरित्राला सुरुवात करून लेखन-कालापर्यंतच्या घटना, प्रसंगांतून 'स्व' प्रतिमा रेखाटणे ही तंत्रविषयक परंपरा या आत्मचरित्रांनी मोडली आहे. तर (५) 'दुर्दैवाशी दोन हात' सरोजिनी शारंगपाणी (६) 'पानाआडचे फूल' आशालता सावे—या आत्मचरित्रांत जन्मापासून लेखनकालापर्यंतची हकीकत येत असली तरी इतर तंत्रविषयक बाबतीत ही आत्मचरित्रे वेगळी ठरली आहेत. सरोजिनीबाईंनी काल्पनिक सखीला आपली कहाणी ऐकविली आहे व आशालताबाईंनी पत्ररूपाने आत्मचरित्र लिहिण्याचा प्रयोग केला आहे.

या आत्मचरित्रकार स्त्रिया निरनिराळ्या समाजातील व निरनिराळ्या व्यवसायातील आहेत. पतिभक्त स्त्रिया, स्वतःकडे अधिक लक्ष पुरविणाऱ्या स्त्रिया विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या स्त्रिया अशी एकाच स्त्रीत्वाची विविध रूपे या आत्मचरित्रांत चित्रित झालेली आढळतात. नैसर्गिक रीत्या लाभलेले स्त्रीत्व तेवढे समान असले तरी प्रत्येकी मनोवृत्ती भिन्न आढळते. व्यक्ती तितक्या प्रकृती याचा प्रत्यय या ठिकाणी येतो.

पतीच्या छायेतील स्त्रियांनी पतीच्या प्रतिमेला प्राधान्य देऊन 'स्व' प्रतिमा चित्रित केली आहे. रमाबाई रानडे, लीलाबाई पटवर्धन, अन्नपूर्णाबाई रानडे, इंदिराबाई भागवत, लक्ष्मीबाई पटवर्धन, राधाबाई आपटे या सर्व स्त्रिया पतिभक्तीने भारलेल्या आहेत. पतिनिधनानंतर 'परिमळु निगालेया पवनापाठी। मागे फूल राहे ओस देठी'। अशी त्यांची अवस्था झालेली आहे. एक मंगल व्यक्ती म्हणून त्या पतीकडे पाहताना दिसतात. त्यांना भावलेली पतीची प्रतिमा शंभर टक्के गुणवती वाटते. पती हाच परमेश्वर असल्याने त्याच्या विरुद्ध तक्रार करणे त्यांच्या मते पाप ठरते. त्या आपल्या व्यथांना शब्दरूप देताना दिसत नाहीत. राधाबाई आपट्यांनी आपणहून आपले अस्तित्व पतीच्या स्वाधीन केले आहे तर इतर स्त्रियांनी पुरुषांनी गाजविलेल्या वर्चस्वाला मनोमन मान्यता दिली आहे. एकट्या शीलवती केतकर याला अपवाद आहेत. डॉक्टरसाहेबांच्या गुणांचे शीलवतीबाईंनी तोंड भरून कौतुक केलेले आहे परंतु त्याबरोबरच डॉक्टरसाहेबांचे दोषही त्यांनी सांगितले आहेत. पतिचित्र रेखाटताना 'स्व' अस्तित्वाचा विसर पडल्याने या स्त्री-प्रतिमा फारच फिकट आल्या आहेत. लक्ष्मीबाई टिळकांनी पतिभक्तीबरोबर स्वतःचे स्वतंत्र अस्तित्वही जोपासले आहे. त्यामुळे पतिभक्त लक्ष्मीबाईबरोबरच स्वतंत्र अस्तित्व असलेली लक्ष्मीबाईंची प्रतिमाही 'स्मृतिचित्रांत' चित्रित झालेली आढळते.

लोकाग्रहास्तव लिहिलेली आत्मचरित्रे, स्वतःसाठी लिहिलेली आत्मचरित्रे, तंत्रविषयक परंपरा मोडणारी आत्मचरित्रे, सहचरित्रे, पुत्रप्रेमापोटी

जन्मलेले 'माझा नाना' या सर्व आत्मचरित्रांतील स्त्री-प्रतिमा वैविध्यपूर्ण आहे.

बाया कर्वे, गिरिजाबाई केळकर, सत्यभामाबाई सुखात्मे, जानकीबाई फडणीस, स्नेहप्रभा प्रधान, आनंदीबाई विजापुरे, राई आठवले, आनंदीबाई शिर्के, आशालता सावे व सरोजिनी शारंगपाणी या सर्व स्त्रिया पांढरपेशा समाजातील आहेत. त्या प्रत्येकीच्या वाट्याला आलेल्या समाजाची अवस्था जवळपास सारखी आहे. तरीही एक दुसरीसारखी नाही. प्रत्येक स्त्री आपल्या स्वतंत्र वैशिष्ट्याने वेगळी ठरली आहे.

अनाथ-अपंगांना मदतीचा हात देणे ही बायाची समाजसेवा आहे तर खेड्यातील स्त्रियांना सुशिक्षित करणे ही गिरिजाबाई केळकर यांची समाजसुधारणा आहे. सत्यभामाबाई सुखात्मे जीवनात समाधानी आहेत. जानकीबाई फडणीस आदर्श गृहिणी म्हणून वाचकांसमोर आल्या आहेत. स्नेहप्रभा प्रधान यांचे विस्कटलेले जीवन लक्षवेधी ठरले आहे. स्वतःच्या जबरदस्त महत्वाकांक्षेमुळे आनंदीबाई विजापुऱ्यांनी जीवनाचे वाटोळे करून घेतले आहे. राई आठवले आपल्या 'आंब्याचा टाळा' या उपाधीने वेगळ्या ठरल्या आहेत. आनंदीबाई शिर्के त्यांच्या सोज्वळत्वाने स्मरणात टिकून राहतात. कन्या, प्रेयसी, पत्नी व आई या सर्व भूमिका यशस्वीपणे पार पाडल्यावर आशाबाईंनी स्वीकारलेले साधल्यांचे शिष्यत्व त्यांचे वेगळेपण दर्शविते. सरोजिनी शारंगपाणी त्यांच्या दुर्दैवाने वाचकांच्या हृदयाचा ठाव घेऊन बसल्या आहेत.

पार्वतीबाई आठवले, शांता आपटे, कमलाबाई देशपांडे, रोहिणी भाटे, मृणालिनी देसाई, सुधाताई अत्रे, ज्योत्स्नाबाई भोळे, हंसा वाडकर, गोदावरी परुळेकर, सुमतीबाई शहा, प्रमिलाबाई भालेराव व गंगूबाई पटवर्धन या स्त्रिया कोणत्यातरी छंदाने किंवा आवडीने प्रेरित झाल्या आहेत. आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी त्या अविरत झटल्या आहेत. यातील प्रत्येक स्त्री ध्येयाने प्रेरित झालेली असली, काहींच्या ध्येयात व ते साध्य करण्याच्या प्रयत्नांत सारखेपणा असला तरी प्रत्येक स्त्रीने 'स्व' अस्तित्व टिकवले आहे.

विधवांची उन्नती करणे हे पार्वतीबाईंचे ध्येय आहे. तर विधवा व परित्यक्ता स्त्रियांच्या सुखासाठी झटणे हे सुमतीबाईंचे ध्येय आहे. विधवांची उन्नती करणे हा दोघींच्या ध्येयातील समान भाग आहे. परंतु त्यांनी ध्येयप्राप्तीसाठी केलेले प्रयत्न भिन्न आहेत. पार्वतीबाई वपन केल्यानंतर केस वाढवून समाजाला एक प्रकारचा धक्का देऊन विधवांसाठी केलेल्या कार्याने अमर झाल्या आहेत. सुमतीबाई आपल्या 'पद्मश्री' या पदवीने भारताचे भूषण ठरल्या आहेत.

शांता आपटे, हंसा वाडकर, ज्योत्स्ना भोळे या तिघीही गायक, अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी पावलेल्या आहेत. तिघींचेही वावरण्याचे क्षेत्र चित्रपट सृष्टी व रंगमंच हे आहे. शांताबाई व हंसाबाई त्यांना या क्षेत्रात आलेले कडवट अनुभव सांगतात. त्यावरील वेगड काढून दाखवितात. कलाकारांना विफल करण्याचा हा त्यांचा प्रयत्न नसून त्यांना सावध करण्यासाठी त्यांनी घेतलेली ही खबरदारी आहे. ज्योत्स्नाबाईंना मात्र या क्षेत्रात कुठेही वाईटपणा जाणवत नाही. सगळीकडे आनंदी आनंद दिसतो. एकाच क्षेत्रातील स्त्रियांच्या अनुभवातील ही भिन्नता आहे. शांताबाई सिनेमाक्षेत्रातील नेत्रदीपक यशाने, हंसाबाई 'माणूस' म्हणून आणि ज्योत्स्नाबाई सर्वच क्षेत्रात मिळविलेल्या विजयामुळे 'स्व' स्मृती टिकवून आहेत.

कमलाबाई देशपांडे, सुधाताई अत्रे, गंगूताई पटवर्धन या शालेय जगातील आहेत. कमलाबाई साताऱ्याच्या कन्याशाळेमुळे व सुधाताई नाशिकच्या शाळेमुळे स्मरणीय ठरल्या आहेत. गंगूताई पटवर्धन यांनी चाकोरीबाहेरच्या जीवनाने व शालेय कार्यातील यशाने स्वतःचा निराळा ठसा उमटविला आहे.

गोदावरी परुळेकर यांचा वारली या आदिवासी जमातीतील 'माणूस' जागा करण्याचा प्रयत्न सर्वस्वी वेगळा व धडाडीचा वाटतो. देशसेवा करण्याच्या निमित्ताने एक 'देशभक्त' म्हणून मृणालिनीबाईंनी भोगलेल्या यातना लक्षणीय ठरल्या आहेत. नियतीने पदरात घातलेले वैधव्य झुगारून देऊन कामगारांच्या

चळवळीतील कार्यकर्त्या म्हणून उपाताई डांगे यांनी 'स्व'अस्तित्व चिरंजीव केले आहे. रोहिणीबाईंची नृत्याची आवड नृत्यकलेतील चांगुलपणावर प्रकाश टाकणारी आहे. अशी मानवी ध्येयांची विविध दर्शने या आत्मचरित्रांतून घडतात.

सहचरित्रांतून प्रकटलेल्या यशोदाबाई जोशी व रूथबाई हिवाळे या 'यशस्वी' व 'कृतार्थ' जीवनाने स्वतःची प्रतिमा रेखाटून गेल्या आहेत. वेणूबाई आजरेकर यांनी मातेच्या भूमिकेने लक्ष वेधून घेतले आहे.

स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहून आपल्या वैशिष्ट्यांनी या वाङ्मय-प्रकाराला समृद्ध केले आहे. त्या निमित्ताने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील —

स्त्रियांनी रेखाटलेली पतीची प्रतिमा

रमाबाई रानडे व लक्ष्मीबाई टिळक यांनी निव्वळ पती या दृष्टिकोणातून 'माधवराव' व 'नारायणराव' यांच्या व्यक्तिरेखा रेखाटून लोकांना अज्ञात असलेले त्यांचे घरगुती रूप उजेडात आणले आहे. लीलाबाई व माधवराव पटवर्धन यांच्या स्वभावात असलेल्या मूलभूत भेदांमुळे होणारी लीलाबाईंची कुचंबणा व माधवरावांची कुतरओढ या मानसिक गुंतागुंतीमधून माधवरावांची व्यक्तिरेखा साकारली आहे. 'स्मृति-तरंगा'तील इतर घटना-प्रसंगांच्या गजबजाटामुळे रानडयांकडे पाहिजे तितके लक्ष न पुरविता आल्याने रानडयांची प्रतिमा पुसट वाटते. इंदिरा भागवतांनी यादवरावांच्या समाजातील स्थानालाच महत्त्व देऊन कर्तबगार यादवरावांची व्यक्तिरेखा उभी केली आहे. रमाबाई केदार व लक्ष्मीबाई पटवर्धन यांनी सामाजिक घटनांबरोबरच घरगुती घटनांना प्राधान्य देऊन नानासाहेब केदार व डॉक्टर पटवर्धन यांच्या व्यक्तिरेखा स्पष्ट केल्या आहेत. दोन्ही बाबतीत राखलेला समतोल हे या व्यक्तिरेखांचे नाविन्य होय. पत्नीला सहधर्मचारिणी म्हणून वागविणारे आपटे गुरुजी राधाबाई आपटयांनी उभे केले आहेत. पतीने पत्नीला दिलेला मान हे या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण म्हणता येईल. 'पती' म्हणून त्याची पूजा न करता किंवा न कळत दोष सांगणे असे न करता शीलवती-बाईंनी निर्भीडपणे डॉ. केतकरांची गुणदोषात्मक प्रतिमा रेखाटली आहे. हा कदाचित् पाश्चात्य संस्कृतीचा परिणाम असेल पण मराठीतील पति-चरित्राने उचललेले ते पुढचे पाऊल आहे.

पतीचा पत्नीकडे पाहण्याचा दृष्टिकोण :

पतीविषयी आदर व भक्ती असल्याने स्त्रिया सतत पतीच्या कलाने वागताना दिसतात. परंतु त्या मानाने पतीचे पत्नीकडे दुर्लक्ष झालेले दिसते. पत्नीने आपल्या हुकुमानुसार चालावे ही वृत्ती हाडी-मासी खिळलेली आढळते. बहुतेकांनी वेळ-प्रसंग पाहून आपला नवरेपणा कमी अधिक प्रमाणात गाजविलेला दिसून येतो.

स्त्री-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते न्यायमूर्ती रानडे, रमाबाईंनी आपल्या हुकुमाप्रमाणे वागावे अशी हुकुमत गाजविताना दिसतात. टिळकांना स्वतःच्या बेशिस्त वागणुकीची जाणीव झाल्यावर ते "मी तुला फार त्रास दिला. मला क्षमा कर". (स्मृतिचित्रे।३ पृ. १४३) अशी लक्ष्मीबाईंची क्षमा मागत असले, तरी वेळी अवेळी त्यांच्यातील पतित्व जागे झालेले आढळते. टिळक स्वतः मान्यवर प्राध्यापक आहेत. अनेक विद्यार्थी त्यांच्या हाताखाली शिकून तयार झाले आहेत. लक्ष्मीबाई खऱ्यांना लिहिता-वाचता येते तर लक्ष्मीबाई टिळकांनाही यायलाच पाहिजे असा त्यांचा अट्टाहास आहे. ढीगभर पुस्तके गोळा करून "शब्द म्हणजे काय ?" (स्मृतिचित्रे।१ पृ. ८१) या प्रश्ना-पासून ते लक्ष्मीबाईंना शिकविण्यास सुरुवात करतात. शिकविण्यास सुरुवात करताना लक्ष्मीबाईंची — आपल्या विद्यार्थ्याची तयारी किती आहे हा प्रश्न विचारात घेतला जात नाही. "शब्द म्हणजे शब्द" (स्मृति चित्रे।१ पृ. ८१) हे लक्ष्मीबाईंचे उत्तर आणि अखंड हसणे यामुळे टिळकांच्या जीवाचा संताप होतो. आणि ते पुस्तकांना काडी लावून मोकळे होतात. तव्यावर गोवऱ्या भाजणे, सोनाराकडे नथ देणे या प्रसंगांमधूनही टिळकांचे पतित्व जागे होताना दिसते. टिळक जाणूनबुजून असे वागत नसतील पण नकळत का होईना एका पतीचा पत्नीवर — टिळकांचा लक्ष्मीबाईंवर अधिकार मात्र गाजविला गेला. माधव-राव पटवर्धन सुशिक्षित आहेत. पुरोगामी विचार-सरणीचे आहेत. स्त्री ही पत्नी असण्यापेक्षा मैत्रीण असावी अशी त्यांची पत्नीकडे पाहाण्याची उदार व

विशाल दृष्टी 'आमची अकरा वर्षे' सांगतात. माधवरावांना विद्याव्यासंगाची आवड आहे तर लीलाबाईंना घर नीटनेटके ठेवण्याची ! शिवणाटिपणाची ! थोडक्यात गृहिणीपदाला साजेशा गोष्टींची आवड आहे. पण माधवराव लीलाबाईंची ही आवड जोपाशीत नाहीत. घरकामात सारा वेळ घालविण्यापेक्षा स्वयंपाक घरात दोन पदार्थ कमी करून लीलाबाईंनी विद्या वाढवावी असा माधवराव आग्रह धरतात. त्यासाठी सामदाम यांचा उपयोग करून त्यांच्या डोळ्यांतून पाणी काढायलाही ते कमी करीत नाहीत. ही माधवरावांमधील पतिदेवांची करामत असावी की लीलाबाईंच्या भवितव्याचा हा विचार असेल ? लीलाबाईंना दोन्ही प्रकारचे शिक्षण त्यांना देता आले नसते काय ? यादवराव भागवत, बंदरकर, डॉक्टर केतकर, शिर्के, सावे यांच्या वागणुकीतूनही अनेकदा वरील अनुभव येतो.

काही आत्मचरित्रांत पती पत्नीशी स्वतःची हुकुमत न गाजविता समझोत्याने सहधर्मचारिणी या नात्याने वागताना दिसतात.

"तुला विचारल्यावाचून मी कोणताही निर्णय आयुष्यात घेणार नाही" (उमटलेली पावले/पृ. ४९) अशा विचाराने आपटे गुरुजी नेहमी राधाबाईंशी वागताना दिसतात. आनंदीबाईंच्या बहकण्यावरही आपल्या नवरेपणाची हुकमत न गाजविणारे विजापुरे चारचौघांपेक्षा वेगळे वाटतात. ज्योत्स्नाबाईंना सर्व प्रकारच्या सवलती देऊन त्यांच्या गुणांचा विकास करणारे केशवराव भोळे एक आदर्श पती म्हणून संबोधण्यास हरकत नाही. परंतु अशी उदाहरणे बोटांवर मोजण्याइतकी अल्प आहेत.

स्त्रियांची भाषा

स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व असलेली स्त्रियांची भाषा हे स्त्री-आत्मचरित्रांचे फार मोठे आणि डोळ्यांत भरण्यासारखे वैशिष्ट्य आहे. लहानपणी अनुकरणातून येणारी भाषा अंगवळणी पडते. ती जन्मभर जिभेवर रुळते आणि लेखनातही उतरते. या स्त्रियांच्या बाबतीत बोलण्याची भाषा वेगळी व लिहिण्याची भाषा वेगळी हा भेद फारसा आढळत नाही. म्हणूनच लक्ष्मीबाई टिळक, "मला नवल वाटते ते, मी टिळकांना कशी पसंत पडली ह्याचे. माझे रंगरूप अगदी बेताचेच होते; बाकी नाक डोळे जरी रेखीव नव्हते तरी होते व जागच्या जागी होते". (स्मृतिचित्रे।१ पृ. १०) असे बेधडकपणे लिहून जातात. 'मुरडकानोला', 'लोळणफुगडी' असे बायकी शब्द त्या बिनबोभाटपणे वापरतात.

स्वयंपाक घराशी स्त्रियांचा संबंध नित्याचाच असल्याने त्यांची भाषा स्वयंपाक घराचा आधार घेताना दिसते. पार्वतीबाई आठवले भाषण चे वर्णन करतात, "भाषण अगदी झणझणीत झालं" (माझी कहाणी।पृ. ३५) स्वयंपाक घरातील 'झणझणीत' भाजी, चटणी, आमटीच्या संबंधाचेच हे प्रतीक होय. मी गप्प बसणारी नव्हते याचे वर्णन बाया कर्वे करते, "मीही चांगली खमंग होते". (माझे पुराण।पृ. ५०) स्वयंपाक घरातील खमंग जिन्नसांच्या सान्निध्याचा हा भाषेवरील परिणाम वाटतो.

प्रसंगी स्त्री-लेणीही भाषेचा आधार झाली आहेत. बाया कर्वे लिहिते, "पंडिता रमाबाईंचा उपदेश मी टिकलीसारखा गोंदून ठेवला". (माझे पुराण।पृ. ३५). अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

अशी वैशिष्ट्यपूर्ण आत्मचरित्रे लिहून स्त्रियांनी मराठी वाङमयात अतिशय मोलाची भर घातली आहे. आत्मचरित्राचे सर्वसामान्य तंत्र बहुतेक आत्मचरित्रांनी पाळलेले आहे. 'स्व'प्रकटन हा आत्मचरित्राचा हेतू जवळपास सर्व आत्मचरित्रांकडून सफल झालेला आहे. 'माझे पुराण', 'स्मृतिचित्रे', 'गेले ते दिवस', 'सांगते ऐका', 'हे गीत जीवनाचे !', 'सांजवात' व 'दुर्दैवाशी दोन हात' या कलाकृती अक्षर ठराव्या इतक्या उत्तम ठरल्या आहेत.

स्त्री-आत्मचरित्रांची अनमोल कामगिरी लक्षात घेता, "आत्मचरित्रे या दालनात स्त्रियांनी अविस्मरणीय कामगिरी बजाविली आहे"[१] असे कमलाबाई देशपांडे कौतुकाने म्हणतात तर माधव मनोहरांना स्त्रियांची आत्मचरित्रे म्हणजे मराठी वाङमयाची "अम्लान भूषणे"[२] वाटतात.

ही मान्यवर समीक्षांची मते स्त्री-आत्मचरित्रांची मराठी वाङमयातील कामगिरी समर्थपणे सांगून जातात.

---

१. कमलाबाई टिळक, 'मराठी साहित्यातील स्त्रियांची कामगिरी' **भारतीय स्त्री,** संपादक श्री. ना. बनहट्टी, मो. ज्ञा. शहाणे, पुणे, पृ. १७४.

२. माधव मनोहर, 'स्मृतिचित्राशी नाते सांगणारे आत्मचरित्र', **लोकमत** (रविवारची पुरवणी), नागपूर, दिनांक २७–८–७७, पृ. ६.

⊕ ⊕ ⊕

चिं. त्र्यं. खानोलकरांच्या 'पोषाख'–गर्भित कविता / सुलभा हेर्लेकर

आरती प्रभूंच्या कविता एका प्रतिभावंत कवीच्या लेखणीतून उतरलेल्या कविता आहेत, किंवा त्यांच्या कवितेचा रंग दुःखभरी आहे किंवा त्यांच्या कवितांतून मृत्यूची त्यांना लागलेली ओढच होती इत्यादी विचारांचे चर्वितचर्वण समीक्षकांच्या सिध्दहस्त लेखणीतून केले गेले आहे. ते तिथेच थांबलेत. एक वाचक या नात्याने जेव्हा मी त्यांच्या कवितांकडे बघते तेव्हा आरती प्रभूंच्या कवितेचे वळण मला मुडपल्यासारखे वाटते. ते उलगडायला हवे होते असे अनेकदा वाटून जाते.

आरती प्रभूंच्या सर्वच कवितांबद्दल न सांगता त्यांच्या 'नक्षत्रांचे देणे' मधील विशिष्ट 'पोषाख' या शब्दांची खोच व पोच घेऊन आलेल्या कवितांचाच विचार मी करणार आहे. वस्त्र, वेष व पोषाख या शब्दांनी वेढलेल्या त्यांच्या कविता वाचताना खानोलकर कुठेतरी गतजन्मात हरवल्यासारखे वाटतात. खानोलकरांच्या या कविता म्हणजे कोकणातला सूर्यास्त वाटतो. अंतरंगात तप्त पण बाह्यतः शांत. तिथे तांबड्या रंगाची धग आहे. निळ्या रंगाचा थंड शिडकावही आहे. उदासीन तपकिरी रंगालाही इथे अर्थ आहे. तेही या कवितांत सजीव होत्साते दिसतात. 'काळा पोषाख', 'उदी पोषाख', 'गतजन्मीचा पोषाख' अशा अनेक पोषाखांतून कविता फुलते तेव्हा हे सारे रंग फुलते नसून मावळते आहेत हे सहज लक्षात येते. या साऱ्या कविता प्रेमकविता आहेत असे गृहीत धरले तरी त्या सफल प्रेमाच्याही नाहीत आणि निखळ प्रेमाच्याही नाहीत. त्या आहेत उदास प्रेमाच्या. 'नांव तुमचे घेत रावा लगबगी मी येतसे। येथ झोपाळाच नुस्ता मंद राही हालता।' इथे नुसत्या झोपाळाच्या हलण्याच्या क्रियेने खानोलकर एक गडद अंधारी रंग सोडून देतात. 'हा उदी पोषाख माझा ही पसंती आपली' आपल्याच पसंतीचे रंग असूनही मी चित्रही रेखू शकत नाही ही अंतर्मनातली व्यथा पुढील जन्मापर्यंत तग धरून राहते.

'हे जुने पोषाख झाले, संपलेली ही तनू
दागिने उतरू निघालें, काय मी माझे म्हणूं ?

या जन्मातला सारा शृंगार मी उतरवून जात आहे ही मूळ कल्पना. ह्या तनूचे ह्या जन्मातले कार्य संपले म्हणून हा जुना पोषाख टाकून नवीन धारण करायला निघाल्येय अशी मूळगर्भ कल्पना. इथे कविवर्य तांब्यांच्या कवितेचे धागे मला जुळलेले वाटतात. मृत्युविषयक कविता लिहिताना तांबे,

'पोषाख नवनवा मला दिला
नवनवा मुलुख मज दाखविला !'

असे जेव्हा सांगतात, तेव्हा त्यांच्या कवितेचे सूत्र खानोलकरी कवितेशी जुळलेले वाटते. 'जुना पोषाख टाकून नवीन धारण करणे म्हणजे एका जन्मातून दुसऱ्या जन्मात सहजगतीने जाणे' असे ते मृत्यूचे स्वागत करतात. तद्वतच 'आता हाती ही राहिलेली फुले। एवढीच तूं घे' म्हणून खानोलकरी प्रेयसीही पुढच्या जन्माची वाट शोधते.

खानोलकरांना स्त्रियांबद्दल न्यूनगंड होता वगैरे विधाने समीक्षक कितीही करोत, मला मात्र खानोलकरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण खोल अंतर्मनातल्या प्रवाहाशी निगडित होता असं जाणवतय.

खेळ ऐसा खूप झाला रंगला अन् संपला
एक ऐसा डाव मांडू रंग झेलू आतला !

हे आतले रंग वेचण्याची, त्या रंगात बुडण्याची खानोलकरांची निस्सीम तयारी होती. वरवरच्या पोषाखाचे बाह्य फसवे रंग त्यांना नको होते. तर आतल्या अंतर्प्रवाहात झोकून देणाऱ्या मोरपखी रंगाचा त्यांना हव्यास होता. स्त्रीमनापाशी ते कुठेतरी लीन झाले होते. व्यक्तित्व कुठलेही असो मग ते सामान्य वा अलौकिक, त्याचे जीवन हे परस्परविरोधी अशा धाग्यांनी विणलेले असते.

हा परस्परविरोधीपणा आपल्याला एकदम लक्षात येत नाही. पण असामान्य लेखणी लाभलेल्या व्यक्तींच्या बाबतीत प्रसिध्दीचा त्यांना शापच असतो. तो खानोलकरांना होता असे वाटते. स्त्रीपुरुषांच्या संबंधात खानोलकरांच्या ठाम अशा नियतीच्या कल्पना होत्या त्यांच्या कादंबऱ्यांना तर नियतीच्या शापाचे देणेच आहे. 'विपयवासना' या मूलभूत प्रवृत्तीवर त्यांचा अधिक जोर आहे. त्यांच्या मनस्वी आणि जिद्दी प्रतिभेचे संस्कार त्यांच्या अंतर्बाह्य लिखाणात सर्वत्र दिसतात. डोंगरमाथ्यावरची शब्दकळा आणि आदिम मानवी जीवनाचे अस्फुट नाते यांचा सुरेख संगम त्यांच्या कवितांत होऊन सुरांच्या लयीची एक वेधघेणी चिरयात्रिक पट्टीच त्यांच्या लेखणीतून उमटते.

खानोलकर कवितांतून स्वप्नातल्या स्वप्नात झपाटल्यासारखे दिसतात. त्यांच्या कलात्कम कला-सजावटीतला अनुभव अत्यंत तारुण्यात्मक चैतन्य-शक्तीने मुसमुसलेला दिसतो. प्रतिके कुठली घ्यावी किंवा प्रतिकांतले कोणते रूप स्वीकारावे या विचारांवर त्यांची कोकणची पार्श्वभूमिपर मनोवृत्ती विचार करायला लावते.

'हिला कुणी शिकवल्या या
कलंदर कळा ? कुणी दिलेत
पराभवाचे पोलाद पचवणारे
हट्ट ? जे वाटताहेत मागावेत
पोपाख सुध्दा नामोहरम

करताहेत उद्दामपणे डोळे'. हे हट्ट खानोल-करांच्या वाचकांनाही नामोहरम करतात. 'हिच्या एकेक पवित्र्याचे होऊन मिटलेय एकेक कमळ। असे सांगताना मिटलेल्या कमळातून स्त्रीत्वाची एक जबरदस्त लीनतेची पकड ते घेतात. तशी तिची वेपर्वाईही सांगतात कलंदर कळांतून. इथे वासना जाणवते का ? मला तसे मुळीच वाटत नाही. वासनेच्या भोवती फिरणारे त्यांचे मन श्रध्दायुक्त वाटते. ती श्रध्दा स्त्रीविपयक असो अगर नियतिविपयक असो. मानवी मनाच्या आत दडलेले असे काही गूढगर्भ, गहनही ते सांगत नाहीत. खरे म्हणजे कलात्मकतेने भारलेल्या लेखणील. ही सारी गहनत. पेललीही असती पण खानोलकरांनी इथेच पूर्णविराम घेतला.

अनुभवानेच अनुभव साकार करावा किंवा सारी कविताच एक अनुभवमय व्हावी अशी खानोलकरी पद्धत. इथे एक स्पष्ट करायला हवय की खानोलकर उदास रंगाचे कवी आहेत. दुःखाला उमलवून जवळून घेणारे आहेत. तरीही त्यांच्या दुःखाचे नाद पेलणारे आहेत. 'गाणे' यात सबंध घरात गाणे सुरू आहे.

'माडीवरच्या एका खिडकीत उजळला मंद दिवा त्याने धिमी शीळ घुमवली, पोपाख उतरला ! इथे पोपाख उतरवणे याला पुन्हा विपयवासनेला उधाण यावे पण कवी इथे तसा वागत नाही. या गाण्याने खोलीचे भान हरवलेले आहे. एक संपूर्ण गाण्याचा अनुभव गाणेमय झाला आहे. इथे कुठेही विवमाईन छटा खानोलकरांनी आणलेली नाही. प्रतिमेतील खोलपणा अनुभवातला विरोध वितळवून टाकतो. नग्न छातीवर तिचे मीलन होते ! या अनुभवात कवीचे कलात्मक मन, प्रियकर प्रेयसीचे मन आणी वाचकाचे मन एकाच पातळीवर येऊन जातात. हा अनुभव एकदम नवीन आहे. या एका अनुभवातून नवीन निर्माण होणे याला महत्त्व आहे. स्वराघातांनी अनुभव समृध्द होणे आणि अनुभवाला नवीन चिरंतनत्व लाभणे इथेच कवितेचे यश आहे.

स्वतःचा शोध घेता घेता कवी पोपाखाबद्दल उदासीन आहे. 'नुसते नुसते पोपाखच बदलीत होते' ।।
आरशाला तर तडा गेलेला नव्हता ना ?'

यात पोपाख बदलताना स्वतःच्या शरीरातली लय तिला सापडतच नव्हती की देहाचे स्वरूपच कळले नव्हते ? म्हणून आरशाला तडा जाणे, यातून कवीने तिच्या उललेल्या तडकलेल्या मनाची आंदोलने किती विवस्त्र करून टाकलीत.

'सावल्यांच्या पल्याड असा एक देश.
जिथला वेप नको उतरायला, चढवायला' ! आणि मग स्वतःच्या शरीरातले वैय्यर्थ जाणवून सावल्यांना मिठया मारणाऱ्या मनाचा चित्रलेख कवी रेखतो की जिथला देश बरा, तिथे वेप चढवणे उतरवणे नको. विवस्त्र देशात, विवस्त्र शरीर

मनाच्या सावल्यांना घेऊन. मग या, माधव आचवल म्हणतात तशा 'अंधारातल्या सावल्या' काय? निश्चितच. काळोखातल्या सावल्यांना अंधाराचे काय पण कुणाचेच भय नसणार.

'काळच्या पोषाखातील उल्का झिण काली झिणझिण तुटली.

आणि हजार मोरांचेच पिसारे अंधारावर आले.

वेढून आले तिच्याच देहा तिच्याच देही मिटले.'

इथे अशी खानोलकरी उदासी काळोखात मिटून जाते. दोन 'मी' यात 'कोणते पोषाख त्याचे चोरिले, मी भर्जरी'। असा प्रश्न करून

'मैफलीला तो नि मी दोघेहि जातो धावूनी।

ऐकतो मी सूर, अन् दूरचे घंटाध्वनी!' असं वर्णन करतात. खानोलकरांच्या अंतर्मनातले हे घंटानाद आहेत. मनाचे पोषाख त्यांनी चोरून देहावर चढवलेत. ही कल्पनाच मुळात मनाने शरीरावर कलम केल्यासारखी: पण या दोन मनांचे सूरही जुळत नाहीत. मैफलही रंगत नाही. ही जाणीव झाली म्हणून खानोलकर या जगाच्या मैफलीतून उठून गेलेत काय? मग हे दूरचे घंटाध्वनी असेच घंटानाद करीत वाचकांना खोलवर हळू हळू मंद होणाऱ्या नादाबरोबर वितळवत ठेवणार काय?

⊕ ⊕ ⊕

'अंतरीच्या व्यथा' / सुशीला पाटील

'अंतरीच्या व्यथा' हा एप्रिल १९७८ मध्ये प्रकाशित झालेला एक वाचनीय आणि मननीय असा कथासंग्रह ! अंतरीचा ठाव घेणाऱ्या अशा या सोळा कथा. काहींना रामायण महाभारताचा संदर्भ आहे तर काहींना वर्तमानकाळाचा ! दोन विभिन्न कालखंडातील या कथांचे आंतरसूत्र मात्र दुःखाचा वेध हे एकच आहे. भीष्माचार्य, राम, कर्ण यांसारख्या पुरुषांची दुःखेही येथे व्यक्त झाली असली तरी शतकानुशतकांपासून स्त्रीच्या वाटचाला आलेल्या दुःखभोगालाच येथे प्रामुख्याने वाचा फोडली आहे. या पार्थिव जगात निर्भेळ सुखमय जीवन कुणाच्याही वाट्याला येत नाही. सुखापेक्षा दुःखाचेच माप माणसाच्या पदरात अधिक झुकते पडते. माणसाची सदिच्छा, त्याग, निःस्वार्थता या उदात्त वृत्तीही कित्येकदा दुःख निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. केवळ पित्याच्या स्वास्थ्यासाठी भीष्माचार्यांनी भीषण प्रतिज्ञा केली. पण त्यांची सदिच्छाप्रेरित प्रतिज्ञाही अंती दुःखद ठरली. केवळ त्यांनाच नव्हे तर जिच्या समाधानाकरिता प्रतिज्ञा केली त्या सत्यवतीलाही ! त्या प्रतिज्ञेमुळे मिळालेला वरही अंती शापरूप ठरला. कोणत्या मार्गाने दुःख माणसावर आक्रमण करील ते सांगताच येत नाही. व्यक्तीपेक्षा समष्टीला महत्व देणे हे एक सदा वंदनीय वाटणारे, साऱ्यांच्या सामूहिक सुखाचा व्यापक विचार करणारे असे थोर तत्त्व ! पण या आदर्श तत्त्वाला अनुसरल्यामुळे रामाला आणि सीतेलाही असीम दुःख भोगावे लागले. कोणत्या ना कोणत्या तरी स्तुत्य तत्त्वाचा मागोवा घेत असता या दुःखाच्या रीती वाट्याला आल्या आहेत. पण कित्येकदा मानवच जाणीवपूर्वक दुःखाची उभारणी करतो. समाजनामक अमूर्त मानवसमूह कधीकाळी काही संकेत ठरवून देतो, त्या संकेतांना आंधळेपणाने अनुसरण्यात इतरांना जीवनाची इतिकर्तव्यता, वाटते. आणि मग 'नरेंचि केला हीन किती नर।' या उक्तीची सार्थता पटते.

प्रणय आणि वात्सल्य या दोन आदिम भावना ! पण त्यांचा रस्ता समाजमान्य रस्त्यापासून थोडा जरी चुकला तरी समाजपुरुष खवळतो. आणि त्याच्या क्रोधाग्नीत त्या स्त्रीचा आणि त्या निष्पाप अर्भकाचा बळी दिला जातो. कुमारी मातांचे दुःख कुंतीइतके आणि अनाथ पोरक्या मुलांची व्यथा कर्णाइतकी सनातन आहे. पुरुष 'सत्ताक' कुटुंबव्यवस्थेमुळे स्त्रीजातीचा युगानुयुगापासून कोंडमारा होत आला आहे. या साऱ्यांमुळे चिंतनशील मनाला येणारे अस्वास्थ्य या कथासंग्रहात प्रगटले आहे. या कथासंग्रहातील एकएक पात्र म्हणजे मूर्तिमंत कारुण्य ! कारुण्याच्या नाना तऱ्हा येथे मूर्त झाल्या आहेत. समाजातील परंपराभिमानी व्यक्तींनीच हे कारुण्य जन्माला घातले आहे. 'जन्मठेप' या कथेतील शास्त्रीबोवांना मधू व वसंत यांचा विवाह सहज करून देता आला असता. पण त्यांनी तिला सोवळी केली. बोलून चालून तो सासराच ! पण जन्मदात्या पित्याने ही क्षणिक मोहाला बळी पडण्याच्या अपराधाबद्दल तिला गुरासारखे बडवले आणि अनाथाश्रमात सोडून दिले. आईच्या मायेचा पदरही मधूच्या दुर्दैवाला थोपवू शकला नाही. तिला झालेल्या यातनांनी तिच्या पोटी जन्मणारा जीव जन्मतःच गुदमरून मरून गेला. यासारख्या कथा वाचल्या की वाटते माणूस शेवटी प्रेम कशावर करतो ? पोटच्या पोरावर की समाजातील अंध बोथट, पारंपारिक अविचारांवर ? या प्रश्नाचे उत्तर खेदजनक मिळते.

अनाथ मुलांच्या मनीचा सल 'आवर्त' मध्ये चित्राच्या चिंतनातून दर्शविला आहे. अनाथाश्रमात अन्न, वस्त्र, निवारा आणि क्वचित माईसारख्यांचे

व्यापक प्रेम थोडेफार वाटयाला येत असले तरी आईवडलांची उणीव कधीच भरून येत नाही. पोरकेपणाची जखम कायम ओलीच राहते. एका भीषण पोकळीत हे जीव गरगरत राहतात आणि कोणत्याही मोहाला बळी पडतात. चित्राला आश्रमातील बंदिस्त जीवनाचा वीट येतो. ती ठराविक सुरक्षितता तिला तापदायक वाटते. बाह्य जगातील स्वैर स्वातंत्र्याचा मोह तिच्या मनात मूळ धरतो. जोमाने फोफावतो आणि ती आश्रम सोडून आगगाडी नेईल त्या दिशेने जाते. मुंबईच्या अफाट जनसागरात स्वतःला झोकून देते. काही काळ स्वातंत्र्याचा अनुभव सुखद ठरतो. पण तरुण, सुंदर मुलीवर समाजाची काकदृष्टी टोच मारण्याकरता सदैव टपलेलीच असते. बायकामुले असलेल्या अविनाशच्या गोड बोलण्याला चित्रा फसते. प्रणयपूर्तीच्या आनंदापाठोपाठ वंचनेचे दुःख तिचा पाठलाग करते ती वैतागून जीव देण्यास निघते. आणि 'रेस्क्यू' स्त्री म्हणून परत आश्रमाच्याच आश्रयाला येते.

युध्दकाळात तर सीमारेषेवरील तरुणींचे जीवन नेहमीच धोक्यात असते. राष्ट्राराष्ट्रांच्या भांडणात निरपराध स्त्रिया कायमच्या उद्ध्वस्त होऊन जातात. त्यांच्या वैराण जीवनाचे चित्र 'पाही कोण अशा हृताश हृदया !' या कथेतील सुचिताच्या रूपात रेखाटले गेले आहे. 'क्षणि या दुभंगुनिया !' या कथेत मातृपितृभक्त असे एक वसंतराव आहेत. त्यांच्या आईवडलांना आपल्या जातीतील सून हवी असते. त्याकरता मीनाचा बळी घेतला जातो. ती लग्न होऊनही कुमारीच राहते. पतीचे वाटेल ते अत्याचार सोशीत राहते. 'त्याग' व 'समस्या' यांतील नायिका मालती व कावेरी आपल्या धाकटया भावंडांसाठी खपतात. त्यांना मोठे करतात. पण पुढे तीच पारंपारिक विचारांच्या झापडा लावलेली-भावंडे त्यांचा पाणउतारा करतात. 'माता कुमाता न भवति !' या कथेत संसाराला मुलीचा हातभार होतो म्हणून तिच्या लग्नाचा विचार न करणारा पिता मुलीकडून गैरवर्तन होताच तिला कुलटा म्हणावयास सिध्द होतो. समानशील जोडीदार मिळाला नाही तर प्रत्यक्ष पतीदेखील स्त्रीवर बलात्कार करू शकतो, तिचा अनन्वित छळ करू शकतो हे 'हृतबुध्द-' मधील अनघाच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. तिची मातृत्वाची भावना ज्वलंत असते. पतिसुख नसले तरी निदान अपत्यसुख लाभावे म्हणून ती अनाथाश्रमातील मूल दत्तक घेण्याचे ठरवते. पण आपली पारंपारिक कुटुंबसंस्था त्या मुलाच्या पित्याचे नाव विचारून आपणास हैराण करील या विचाराने ती शहारते आणि आपला वात्सल्यभाव दडपून टाकते. फसवणुकीने वा बलात्काराने जन्मलेले आपले मूल सांभाळण्याची धिटाई कावेरी नि शमा दाखवतात. त्याद्वारा आजच्या जागृत स्त्रीच्या जिवंत मनाची खंबीरता स्पष्ट करतात. 'साफल्य-' मध्ये निपुत्रिकेच्या मानखंडनेचे चित्रण आहे त्यावर उपायही सुचविला आहे. स्मिता-सुधाकर या निपुत्रिक जोडप्याने अनाथाश्रमातील मूल दत्तक घेऊन आपल्या जीवनातील पुत्रस्नेहाची पोकळी भरून काढलीच शिवाय समाजापुढे एक आदर्शही ठेवला आहे.

हा कथासंग्रह वाचल्यावर कोणकोणत्या भिन्न-भिन्न मार्गांनी स्त्रीचे जीवन दुःखाने वेढले जाऊ शकते ते निदर्शनास येते. लेखिकेच्या समर्थ भाषाशैलीने या दुःखाची प्रतीती उत्कट झाली आहे. परिपोषकाची भूमिका घेऊन प्रतिपादनाला उठाव देणारी निसर्गवर्णनेही या दुःखप्रतीतीला अधिकच गहिरे करतात. आशयाशी निष्ठा ठेवणारी, भलत्या मोहांना बळी न पडणारी समर्थ भाषायोजना या कथासंग्रहाच्या वाङमयीन यशाचा प्रमुख आधारस्तंभ आहे. त्याखेरीज या कथांचे अंतस्थ सामर्थ्य प्रगट करणारे कितीतरी तळपते विशेष आहेत. रामायण महाभारताच्या डोळस आकलनातून लेखिकेची सुजाण व्युत्पन्नता सिद्ध झाली आहे. पौराणिक पात्रांशी समरस होणारी लेखिकेची तरल संवेदनक्षमता आणि त्या पात्रांवरील अन्यायाची जाण प्रगट करणारी तिची विवेकशील न्यायप्रियता येथे उठून दिसते. अभ्यासपूर्ण निरीक्षणातून लेखिकेचे समाजचिंतनही वेळोवेळी अभिव्यक्त झाले आहे. ही चिंतनशीलता प्रागतिक आहे. विवाहबाह्य संबंधापासून जन्मलेल्या मुलांविषयीची सहानु-

अनुक्रमणिका

भूती येथे प्रगटली आहे. अशा मुलांना सांभाळू इच्छिणाऱ्या माता यात आहेत. अनाथाश्रमातील बालकांना दत्तक घेणारी मंडळीही याठिकाणी दिसताहेत. छळवादी पतीपासून सरळ घटस्फोट घेऊन स्वतःच्या पायावर उभी राहू इच्छिणारी स्वतंत्र, बाणेदार तरुणीही येथे आहे. परंपरेला न रुचणाऱ्या अशा या प्रगतिशील वर्तनरीती लेखिकेने दर्शविल्या आहेत. अशा प्रकारच्या प्रागतिक कृतिशीलतेने रूढिप्रिय समाजातील मानवनिर्मित दुःखाचा फार मोठा बोजा बराचसा हलका होणार अशी लेखिकेची आशादायी निष्ठा या कथासंग्रहातून व्यक्त झाली आहे. आणि म्हणून हा कथासंग्रह केवळ वाचनीयच नव्हे तर भावी समाजहिताच्या दृष्टीने मननीय आहे.

कमल वैद्य, **अतरीच्या व्यथा,** स्नेहदीप प्रकाशन, नागपूर १९७८, पृ. १५७, रु. १२.

⊕ ⊕ ⊕

शाप / विष्णु खरे

झाडे शाप देतात !
उरलेली झाडे हळू हळू आपल्या पायाशी
रेताड वाळवंट आणि ओसाड, नग्न पर्वतांच्या रांगा
सरकत येतांना पहातात.
आणि ती उमजून जातात सारे
तुटून पडण्यापूर्वी.
सुकत जाणाऱ्या आपल्या पानांना
आपल्या शरीराच्या अंतिम गंधाचा दरवळ पोचावा
म्हणून त्यांची धडपड असते.
ढग, नद्या, जनावरे आणि पक्षी
ऐकतात झाडांचे अंतिम श्वासोश्वास
आणि मग सर्व मिळून शाप देतात.
जनावरे आणि पक्षी निघून जातात कुठे तरी
घेरले जाऊन मारले जाण्यासाठी
पण त्यापूर्वी ढगांपासून आणि नद्यांपासून ते वचन घेतात.
सूड घेण्याचे . . .
ढग आणि नद्या संगनमत करतात सूर्याशी,
हवेशी आणि धरतीशी
निर्घृण आणि प्रचंड सूड घेण्यासाठी
आळीपाळीने कधी ओला, कधी सुका.
आणि तप्त मैदानात किंवा बुडालेल्या निवाऱ्यात
टाकून देतात वाळकी किंवा पाण्याने तटतटलेली प्रेते
ती असतात असहाय्य मुलांची, स्त्रियांची,
पुरुषांची आणि अपंगांची.
भुकेने सुकलेल्या किंवा पाण्याने फुगलेल्या
काळ्या शरीरांच्या
उघड्या तोंडातून शाप बाहेर पडतात
तेच शाप
जे झाडांनी दिलेले असतात !

स्वैर अनुवाद : मीनकेतन

⊕ ⊕ ⊕

ग्रंथवेध / श्री. रा. सिरास

प्रा. वि. रा. करंदीकर यांचा 'ग्रंथवेध' हा एक समीक्षापर लेख संग्रह आहे. एकंदर बारा प्रख्यात टीकाकारांच्या चवदा ग्रंथांची समीक्षा यात 'ग्रंथवेध' म्हणून घेतली आहे. बागेत अनेक तऱ्हेचे गुलाब झाडावर फुलतात पण त्यातल्या निवडक फुलांना तोडून त्यातूनही परत रसिकतेने नीट न्याहाळून पुष्पपात्रात त्यांची रचना करण्याचे जे कौशल्य हुषार माळ्याचे राहील त्या कौशल्याची जाणीव 'ग्रंथवेध' वाचून संपविल्यावर झाल्याशिवाय राहात नाही. मुळातच 'ग्रंथवेध' चे स्वरूप चित्तवेधक असे आहे. त्यामध्ये जे ग्रंथ श्री. करंदीकरांनी समाविष्ट केलेले आहेत त्यांत चक्रधर, ज्ञानेश्वर यांपासून तो अभिजात कलावंत म्हटल्या गेलेल्या माधव ज्युलियन आणि वि. दा. सावरकरांपर्यंत सर्वांचा समावेश आढळेल. हे लिखाण जरी अशा विविध प्रवाहांचे दर्शन घडविणारे असले तरी पण त्याला जो एक उच्च बुद्धिमान समीक्षकाचा परिसस्पर्श झालेला आहे तो मनोज्ञ असाच आहे.

प्रा. करंदीकरांची समीक्षादृष्टी ही किती चिकित्सक आहे हे त्यांच्या "ज्ञानेश्वरीची स्वतंत्रता आणि गीतामंत्रता" यासारख्या समीक्षणात पारखून घेता येईल. कारण जेव्हा इतर प्राचीन कवींचे काव्य-ग्रंथ 'संस्कृत ग्रंथावर आधारलेले स्वयंपूर्ण मराठी ग्रंथ अशा विशिष्ट अर्थाने म. वा. धोंड यांनी उल्लेखलेले असतात तेव्हा त्या ग्रंथांचे उदाहरण ज्ञानेश्वरीच्या संदर्भात देणे अशक्य असते. म्हणूनच वि. रा. करंदीकर ज्ञानेश्वर हे आधी संत व नंतर कवी या मताचे आहेत. गीतेवरील टीका म्हणजे एक स्वयंपूर्ण मराठी ग्रंथच ठरतो. ज्ञानेश्वरांनी गीतेने उभ्या केलेल्या आध्यात्मिक समस्यांची उत्तरे शोधली. मात्र त्यात यादवकालात ही रचना झाल्यामुळे जो बदल केला तो मूलभूत नसून फक्त मर्यादित स्वरूपाचा आहे. म्हणजेच, ज्ञानेश्वरी ही गीताटीका आहे पण यादवकालीन परिस्थितीपेक्षा ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वाशी व कविप्रकृतीशीच ती टीका निराळी असण्याचा अधिक संबंध आहे; हे करंदीकरांचे विधान त्यांच्यातील कुशल समीक्षकाचा परिचय घडवून देते.

लोकमान्य टिळक आणि पाश्चात्य संस्कृती या दोन मुद्यांचेही त्यांनी केलेले विवेचन महत्वाचे ठरते. आपल्या तरुणांनी पाश्चात्य विद्येत पारंगत व्हावे हा विचार टिळक प्रामुख्याने मांडतात. पण यामुळे टिळकांना भारतीय परंपराच मान्य नव्हती हे म्हणणे योग्य ठरणारे नाही. टिळकांनी पाश्चात्य विद्येचा आग्रह धरला होता पाश्चात्य संस्कृतीचा नव्हे. आगरकरांनी मात्र तो आग्रह धरला होता असे विधान करतानाही आगरकरांचे, "मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडता" हे महत्वाचे शब्द ध्यानात ठेवावेच लागतील. येथेच करंदीकरांनी रानडे हे अभिमानी असले तरी त्या अभिमानाला जो खोल व्यासंगाचा पाया होता तो चिपळूणकरांच्या अभिमानाला नव्हता हेही स्पष्ट केले आहे. उलट रानड्यांच्या अभिमानालाही एक कठोर आत्मपरीक्षणाची जी झालर होती तीमुळे हा अभिमान संयमित होता. याउलट चिपळूणकरांच्या भाषाशैलीमुळे त्यांची बहुश्रुतता आणि वाग्वैभव प्रगट झाले व ते अधिक परिणाम-कारक लेखन करू शकले. मात्र या बहुश्रुततेनेच चिपळूणकरांच्या अभिमानाचे पोषण घेऊन त्यांची सत्यावरील दृष्टी काही ठिकाणी चळली हे करंदीकरांनी प्रभावीपणे स्पष्ट केलेले आहे.

चक्रधरांच्याबद्दल ढेरे यांनी केलेल्या संशो-धनाला करंदीकरांनी विलक्षण धीट प्रयत्न म्हणून त्याबद्दल त्यांचा आदर केला आहे. कारण ढेरे यांनी कौलमत या शब्दाचा अर्थ देता देता एक शंका प्रदर्शित केली. कौलमत याचा संबंध शिव–शक्ती

या द्वंद्वातील शक्तीशी निगडित मानावयाचा की प्राचीन योनीपूजेशी ? ही ती शंका होय. ढेरे यांच्या मांडणीमुळे जे नवे प्रश्न निर्माण होतात त्यांकडे लक्ष वेधून त्या प्रश्नांच्या सोडवणुकीला ही दिशा ढेरे यांच्याच प्रयत्नातून लाभणार आहे अशी आशाही करंदीकर प्रगट करतात.

डॉ. चुनेकरांनी लिहिलेल्या 'माधवराव पटवर्धन वाङमयदर्शन' या ग्रंथाचा करंदीकर हे रेखीव व अभ्यासपूर्ण विवेचन, या शब्दांत वेध घेतात. मात्र माधवरावांच्या 'ज्युलियन' या टोपण नावाने ग्रंथाचे नामकरण न केल्या बद्दल ते थोडी नाराजी प्रकट करतातच. करंदीकरांनी येथे माधवराव पटवर्धनांच्या कवितेला संकुचितपणा येण्याचे एक कारण सुचविले आहे. ते म्हणतात, "यौवनाच्या प्रारंभकाळी स्त्रीबद्दल वाटणारे निसर्गसुलभ आकर्षण व त्यातून उत्पन्न होणारे प्रेम एवढीच एकली भावना दीर्घकालपर्यंत मनाला व्यापून राहिल्यामुळे पटवर्धनांच्या कवितेला संकुचितपणा आला असावा, जीवनाच्या गाभ्याला स्पर्श करण्याची कुवत त्यांच्या प्रतिभेत आली नसावी." (पृ. २५३). पुढे माधवरावांना आत्मकेंद्रित व्यक्तिमत्व लाभल्यामुळेच त्यांची कविता अतिशय हळवी असली तरी ती 'आतळ अवगाहन' करावयाला असमर्थ ठरली याचेही कारण 'नियतीच तशी होती' या शब्दांत करंदीकरांनी दिले आहे. तसेच चरित्र-लेखकाने सर्वत्र अप्रतिहतपणे अभ्यासविषयाचा सारखाच शोध घेणाऱ्या आपल्या आकलनशक्तीचे दर्शन घडविले आहे, अशी ते ग्वाही देतात. म्हणूनच चुनेकर माधवरावांच्या वाङमयाचे सर्वांगीण दर्शन घडवून शकले. माधवरावांच्या प्रेमकवितेतील अनेक वैशिष्ट्ये सांगताना तिच्यातील मर्यादाही स्पष्ट करण्यास चुनेकर विसरले नाहीत.

'ग्रंथवेध' हा समीक्षा-संग्रह जितका सखोल व मर्मग्राही अभ्यासाची ग्वाही देणारा ठरतो तितकाच त्या ग्रंथापासून मिळणारा आस्वाद हादेखील हृद्य वाटतो. प्रा. करंदीकरांच्या या समीक्षणांनी मराठी वाङमयाच्या अभ्यासकाला एका दर्जेदार अभ्यास-ग्रंथाची भेट दिलेली आहे. म्हणूनच लेखक व धन्यवाद द्यायला हवेत.

वि. रा. करंदीकर, **ग्रंथवेध**
मे १९७८; श्री विद्या प्रकाशन, पूणे,
पृष्ठे २८३; मूल्य २५ रुपये.

⊕ ⊕ ⊕

जोहार / श्री. रा. सिरास

श्री. ई. दा. देशपांडे यांची ही पहिलीच कादंबरी आहे. तरीपण ती वाचताना एखाद्या सराईत लेखकाच्या लेखणीतून उतरलेली कादंबरी तर आपण वाचली नाही ना असा भास होईल इतक्या सामर्थ्यशाली शैलीने ती लिहिली गेलेली आहे. 'जोहार' हे नावच अत्यंत आकर्षक आणि कादंबरीला सर्वार्थाने शोभेल असेच आहे. रजपुत वीरांगनांची ही एक आत्मबलिदानाची पद्धती आहे. अग्नि-प्रवेश म्हणजे 'जोहार', पण या अग्निप्रवेशात त्या वीरांगनेचे शौर्य व शील दोन्ही उजळून निघत व तिला भ्रष्ट करणाऱ्या शत्रूपासून अग्नी आपल्या सामर्थ्याने तिचे रक्षण करीत असे. मीरा ही या कादंबरीतली धुरंधर वृत्तीची व शौर्य गाजवणारी नायिका. मीरा जेव्हा मेहेरसिंगाच्या पेहेरावात वेषांतर करून घोडयाच्या शर्यतीत भाग घेते व तऱ्हेतऱ्हेच्या द्वंद्वयुद्धांत आपली कर्तबगारी दाखवते तेव्हा तिला कुणी ओळखतही नाही. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे लेखकाला या सर्व गतकालीन घटनांपासून जी स्फूर्ती मिळाली त्या पाठीमागे एक अदृश्य व अतींद्रिय शक्ती होती. या अतींद्रिय शक्तीनेच लेखकाला मीराचे दर्शन घडविले आणि तो अत्यंत नवखा असूनही त्याच्या हातून सरस कथा निर्माण होऊ शकली असा लेखकाचा दृढ विश्वास आहे.

याच कारणांसाठी 'जोहार' ची वाचनीयता निराळ्या अर्थाने वाढते. ई. दा. देशपांडे यांनी जोहार मध्ये जे गढींचे वर्णन केले आहे ते पाहिले म्हणजे हा लेखक नवशिका आहे हे पटतच नाही. मीरा ही नायिका 'जोहार' कादंबरीत सतत वाचका-पुढे एक धैर्यवान, धुरंधर, शूर व स्वाभिमानी स्त्री म्हणून वारंवार येत राहाते. त्याचमुळे लेखक समर्थ अशी नायिकाप्रधान कादंबरी, तीही ऐतिहासिक संदर्भात हाताळण्यात यशस्वी झाला आहे.

तळोदीच्या इनामदारांची मीरा ही मुलगी. बारगळ घराण्यात वंशपरंपरागत चालत आलेल्या इतिहासातल्या छोटयाशा घटनेभोवती 'जोहार'-चे कथानक विणलेले आढळते. खराखुरा इतिहास इथे ऐतिहासिक कादंबरीचे रूप घेऊन प्रगट झालेला आहे. त्यामध्ये विशेषत्वाने 'मीरा' या नायिकेचे चित्रण अधिक प्रभावी ठरले आहे.

मीरेचा भाऊ नारायण व मैत्रीण सुभद्रा यांचेही चित्रण सफाईदार आहे. मीराचे वडील मोघाजीराव, तसेच भगवंतराव, शंकरराव, सुभेदार, बागुल, शुक्ल अशी अनेक चित्रे लेखकाने रेखीवपणे रंगविली आहेत. सुभद्रा व मीरा यांचे प्रियकर अनुक्रमे दिनकर व चंद्रभान यांना कादंबरीत गौण स्थान दिले आहे. तसाच श्रृंगार रस जणू कादंबरीतून अंतर्धानच पावला आहे. आणि इतके असूनही ही वीरश्रीयुक्त गाथा 'जोहार' म्हणजे काय याचे दर्शन घडविण्यात समर्थ ठरली आहे.

कादंबरीच्या शेवटी गढीवर खलनायक बनलेला धर्नसिंग हल्ला करतो. स्वतःचा देह धर्नसिंगाच्या हाती लागू नये म्हणून मीरा अगोदरच रचून ठेवलेल्या चितेत प्रवेश करते. मीराचा हा 'जोहार' म्हणजे कादंबरीचा अत्युच्च बिंदू आणि तो अत्यंत परिणामकारकपणे रंगविण्यात लेखक यशस्वी झालेला आहे. एका नवीन लेखका-कडून एवढी सहजतेने एक खूपच परिणामकारक कादंबरी लिहिली जाणे हे जितके आश्चर्यकारक तितकेच ते अभिनंदनीयही ठरते. श्री. ई. दा. देशपांडे यांनी 'जोहार' कादंबरी लिहून वाचकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. अशी वाचनीय कादंबरी प्रसिद्ध केल्याबद्दल प्रकाशक भा. ल. कुळकर्णींचेही आभार.

ई. दा. देशपांडे, जोहार
साहित्य प्रसार केन्द्र, नागपूर १२;
जानेवारी, १९७९; पृष्ठे १८४;
मूल्य १५ रुपये.

⊕ ⊕ ⊕

कृष्णदास दामाकृत आदिपर्व / दिलीप देशपांडे

रामायण आणि महाभारत हे स्फूर्तिदायक ग्रंथ असून बऱ्याच प्राचीन मराठी कवींनी या ग्रंथांचा गोडवा आपल्या अमृतमधुर काव्यरचनेद्वारा गायिलेला आहे. प्राचीन मराठीतील महाभारतावर रचना करणाऱ्यांमध्ये विष्णुदास नामा, कृष्णदास नामा, मुक्तेश्वर, विप्र विश्वनाथ, नामा पाठक इत्यादी अनेक कवींची नावे आपल्या डोळ्यांसमोर दिसू लागतात. याव्यतिरिक्त काळाच्या उदरात काही रचना नाहीशा झालेल्याही असू शकतील. काळाच्या उदरात दडलेल्या रचना कालांतराने सापडतातसुध्दा ! फक्त जरूर असते ती शोध घेण्याची. महाभारतावर रचना करणाऱ्यांपैकी नव्याने उजेडात आलेला एक प्राचीन कवी म्हणजे कृष्णदास दामा. कृष्णदास दामा याने लिहिलेल्या महाभारताच्या आदिपर्वाचे हस्तलिखित अहमदनगर जिल्ह्यातील वांबोरी या गावी श्री. ना. ध. पाटील यांना एका पुराणिकाकडे उपलब्ध झाले असून श्री. ज. शा. देशपांडे आणि श्री. ना. ध. पाटील या दोघांनी त्याचे संपादन केलेले आहे. या कवीविषयीची माहिती ना. ध. पाटील यांनी जुलै १९५८ च्या 'नवभारत'मधून दिलेली होतीच. नुकतेच 'प्राचीन मराठी कविता-खंड ८' मधून 'आदिपर्वा'चे प्रकाशन झालेले आहे.

कृष्णदास दामाने 'आदिपर्वा'ची रचना ५८ 'प्रसंगां'तून केलेली असून एकूण ओवीसंख्या ६७६५ आहे. संपूर्ण आदिपर्व राग धनाश्रीने युक्त आहे. कवी संगीताचा चांगला जाणकार असावा, याचा प्रत्यय ४९ वा प्रसंग वाचताना येतो. त्यात त्याने 'संगीत रत्नाकर' या १३ व्या शतकातील ग्रंथाचा उल्लेख करून संगीतशास्त्रचर्चा केलेली आहे. 'महाभारताची आणि व्यासांची निंदा जनमेजयाकडून घडल्यानंतर त्याचे हातून अठरा ब्रह्महत्या घडतात. ह्या पापामधून मुक्त होण्यासाठी जनमेजयाने महाभारताची अठरा पर्वे ऐकली' या कथानकात अनेक कथा गुंफून कवीने आदिपर्वाची रचना केलेली आहे.

कृष्णदास दामाचे आदिपर्व वाचताना पुष्कळ वेळेस असे वाटते की हा कवी व्यवसायाने पुराणिक असावा व रामायण, महाभारत, पुराण, भागवत इत्यादींचा त्याचा उत्तम अभ्यास असावा. निरनिराळ्या पुराणांतील कथा त्याने आपल्या आदिपर्वात इतक्या सफाईने गुंफलेल्या आहेत की त्याच्या रचनाकौशल्याचे आपणाला विलक्षण कौतुक वाटावे. महाभारतावर रचना करताना मराठी कवी त्यात थोडे फार बदल करतात. कृष्णदास दामाने याबाबतीत भरपूर स्वातंत्र्य घेऊन हवे तसे फरक केलेले आहेत. उदा. सुभद्रा हरणाचे कथानक पाहा (प्रसंग ४१ ते ४३). भारतात दुर्योधनाचा या कथानकाशी संबंध नाही. कवीने तो जोडून दिला इतकेच नव्हे तर मारुती हा सुभद्रेचे रूप घेऊन दुर्योधनाची फजीती करतो अशी गोष्ट त्याने सांगितलेली आहे.

मराठी भाषेबद्दल कवीला यथार्थ अभिमान आहे. शेवटच्या अध्यायात मराठी भाषेतील ग्रंथरचनेचे महत्त्व त्याने अत्यंत बहारीने वर्णिले आहे. कृष्णदास दामाची भाषा साधी व सरळ असून ओघवती आहे. त्याच्या काव्यात आल्हाददायक उपमा, व्यवहारिक दृष्टांत सुभाषिते आदींचे मनोज्ञ दर्शन घडते. तो एक श्रेष्ठ प्रतीचा आख्यानकवी आहे. त्याने युध्दाची वर्णने चित्रमय पध्दतीने केलेली आढळतात. या युध्दवर्णनांत दृष्टिगोचरता आढळते. भीम व शंकर, भीम व कपिलासुर, अर्जुन व शंकर यांच्यांतील युध्दाची वर्णने कवीने बहारीची रंगविलेली आहेत. भीम व कृष्ण यांच्यातील संघर्षाचे हे चित्र पाहा

"हातीं घेतलें सुद्रसेन । तयासी आज्ञा करी नारायण ।
म्हणे भीमाचें शीर छेदुन । तुवा यावे झडकरी ।।७३।।
ऐसें म्हणोनी हृशीकेसी । वेगीं सोडीलें चक्रासी ।
चमत्कारें विजु जैसी । हातीचें गेलें तळपोनीयां ।।७४।।

तवं काये करी भीमसेन । वरी गदा सोडीली अभीमंत्रुन ।
ते सुद्रसेनासीं जाऊन । थडकली असे ।।७९।।
तें वज्रा वज्र आदळले । न्याहा अंबरीं कोंदलें ।
टाळें कृदांताचें बैसलें । बहीरें जालें त्रिभुवन ।।८०।।
(प्रसंग ५४)

अशी अनेक युध्दाची वर्णने वीररसाने ओथंबलेली आहेत. याव्यतिरिक्त काही ठिकाणी करुणरसाचे दर्शन घडते. उदा. पंडुराजाच्या मृत्यूमुळे होणारा कुंतीचा शोक व कपिलासुराच्या मृत्यूनंतर कमलावतीने केलेला शोक कवीने यथार्थ रंगविलेला आहे.

आदिपर्वातून निसर्गाचे मनोज्ञ दर्शन घडते. खांडववनाचा प्रसंग येताच कवीला निरनिराळी फळे, फुले, पशुपक्षी दिसायला लागतात. आपल्या आदिपर्वातून तो पंढरपूर, आळंदी, बारामती, मंगळवेढे, मुंगीवाट इत्यादी महाराष्ट्रातील स्थळांचा उल्लेख करतो. पंढरपूरबद्दल त्याच्या मनात परम भक्तीची भावना असून गोदावरी नदीबद्दल त्याला विशेष प्रेम वाटते. या ग्रंथात वर्णिलेल्या पुष्कळ चालीरीती या महाभारतकालीन नसून त्या कवीच्या काळातल्या आहे. उदा. पैजेचा विडा उचलणे, धेंडा नाचवणे, पाट काढणे इत्यादी

कृष्णदास दामा हा आपल्या आदिपर्वात नामदेवानें भारतरचना केल्याचे आदरपूर्वक सांगतो. 'तवं दामयांनें असे विनविलें । जिं व्यासें भारत संस्कृत केलें । ते मऱ्हाष्ट सांगीतले । नामदेवी ।। प्रसंग १ १४ ।। महिपतींनीसुध्दा 'भक्तविजया'तील "नामदेवमुक्तेश्वरांनी । भारती वर्णिला चक्रपाणी" यातून नामदेवांनी भारतरचना केल्याचे स्पष्टपणेच सुचविले आहे. आता प्रश्न असा उपस्थित होतो की हे आद्य नामदेव असावेत काय ? नामदेव स्वतःला विष्णुदासनामा म्हणवून घेत असावेत अशी शक्यता दिसते तरी पण नामदेवाचे 'भारत' कुठले हा प्रश्न शिल्लकच राहतो. विष्णुदास नामा हा एक विवाद्य कवी आहे. त्याची संहिता निश्चित नाही.

कृष्णदास दामा हा त्याच्या 'कृष्णदास' या नावावरुन महानुभाव पंथीय असावा असे वाटू लागते. परंतु त्याने केलेले पंढरपूरचे वर्णन पाहिले की या गोष्टीला फारशी पुष्टी मिळत नाही. परंतु त्याने महानुभावीयांच्या ग्रंथांचे वाचन मात्र केलेले दिसते. कृष्णदास दामा स्वतःला 'द्विज' म्हणतो व पहिल्याच प्रसंगातून रामदेवराय यादव व हेमाडपंत यांची कथा तो इतक्या जवळिकीने सांगतो की तो यादवांच्या राज्य-प्रदेशातील असावा आणि त्याचा निवास पैठणला असावा असे वाटू लागते. कवीने सभापर्व लिहिले होते, याचे उल्लेख आदिपर्वातून (५४।-६५; ५८।३) आढळतात. अनेक वाक्प्रचार, म्हणी व अभ्यसनीय परकीय शब्द काव्यात आढळतात. कृष्णदास दामाच्या 'आदिपर्वात' अशुध्दतेचा दोषही आहे. कवीने दिलेली सोमवंशाची वंशावळ महाभारताचा अभ्यास करणाऱ्यांना अधिक शोध घेण्याच्या दृष्टीने निश्चितच फायदेशीर ठरणार आहे.

कृष्णदास दामाच्या आदिपर्वाचे साक्षेपाने संपादन करण्याची जबाबदारी संपादकांनी योग्य प्रकारे पार पाडलेली असून त्यांनी ग्रंथाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना, टीपा, शब्दकोष, वाक्प्रचार इत्यादींची जोड दिली आहे.

'प्राचीन मराठी कविता' या मालेच्या संपादनाच्या माध्यमाने श्री. ज. शा. देशपांडे यांनी केलेले एकंदर संशोधनकार्य अत्यंत मोलाचे वाटते.

प्राचीन मराठी कविता, खंड आठवा
कृष्णदास दामाचे आदिपर्व

संपादक ज. शा. देशपांडे.
सहसंपादक ना. ध. पाटील.
१९७९ जानेवारी, किंमत २० रुपये, पृष्ठे ४३०
प्रकाशक मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई.

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त १६–५–१९७९ ते ३०–६–१९७९

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ दि. २४–६–७९ ला कार्यकारी मंडळाची सभा केन्द्रीय कार्यालयात झाली. या सभेत १९७८-७९ च्या चार्टर्ड अकौंटंट कडून तपासून आलेले हिशेब, अहवाल आणि १९७९–८० चा अर्थ संकल्प निवेदित केला.

१.२ श्री. मनोहर म्हैसाळकर यांची मॉईल च्या कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री. ब. न. एकबोटे यांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल आणि प्रा. शिरीष गोपाळ देशपांडे यांच्या विवाहाप्रीत्यर्थ अभिनंदन करण्यात आले. श्री. एकबोटेंना दीर्घायुरारोग्य चिंतिले.

१.३ करंजगाव जि. अमरावती व कारंजा जि. वर्धा या शाखा सभांना मान्यता देण्यात आली.

२. आजीव सदस्य

सर्वश्री (१) रंजन पुरुषोत्तम दारव्हेकर, नागपूर, (२) निळकंठ चंदन नागदिवे नागपूर, (३) रमेश गणेश अंधारे, नागपूर, (४) कु. सुनिती रामकृष्ण देशमुख, अकोला.

३. शोकसभा

दि २४–६–७९ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत विदर्भ साहित्य संघाचे हितचिंतक सभासद व कायद्याचे सल्लागार श्री. ए. ज. मोहरीर आणि साहित्यिक, टीकाकार व पत्रपंडीत श्री. श्री. रा. टिकेकर यांच्या निधनाबद्दल दुखवटा मयवत करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

४. स्मृति दिन व जयंति

४.१ दि. २०–५–७९ ला स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्त "साहित्यिक सावरकर" या विषयावर डॉ. सुधाकर भालेराव यांचे भाषण झाले. अध्यक्षस्थानी श्री. गो. स. देहाडराय होते.

४.२ कै. साने गुरुजी स्मृति दिना निमित्त दि. ११–६–७९ ला डॉ. म. अ. चान्सरकर यांचे हस्ते वि. सा. संघातर्फे चालविलेल्या प्रशिक्षण शिबिरातील बाल कलाकारांच्या निवडक चित्रांच्या प्रदर्शनाचे

४.३ दि. १३–६–७९ ला आचार्य अत्रे स्मृति दिना निमित्त आणि दि. १५–६–७९ ला अच्युतराव कोल्हटकरांच्या स्मृतिदिना निमित्त छायाचित्राला पुष्पहार अर्पण करून ग्रंथप्रदर्शन भरविण्यांत आले.

५. सांस्कृतिक कार्यक्रम

५.१ दि. १३–६–७९ ला विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने स्व. दादासाहेब ओगले जन्म शताब्दी समारंभ साजरा झाला. अध्यक्षस्थानी न्या. भवानी शंकर नियोगी होते व खासदार जयंतराव टिळक होते प्रमुख वक्ते.

५.२ दि. २६–६–७९ ला वि. सा. संघाचे संस्थापक सदस्य कविभूषण बळवंत गणेश उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांच्या द्वितीय पुण्यतिथी निमित्त अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांचे हस्ते अण्णासाहेबांच्या अर्धपुतळयाचे अनावरण झाले. याप्रसंगी श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे भाषण झाले. हा पुतळा डॉ. चावडा यानी तयार केला आहे.

६. नाट्य समिती

६.१ घर अंगण च्या अंतर्गत दि. ९–६–७९ ला भरत नगर नाट्य मंडळातर्फे "मानस सरोवर" ही एकांकिका सादर करण्यांत आली.

७. संगीत केन्द्र

७.१ दि. ३०–६–७९ ला आंतर्राष्ट्रीय बालक वर्ष समारोहांतर्गत श्री. पराग मनमोहन सदाफळ, नवी दिल्ली ह्या बाल कलावंतांचा कथ्थक नृत्याचा कार्यक्रम झाला. तसेच श्री. पंकज सदाफळ या बालकाने त्याच्या निवडक ५ इंग्रजी कवितांचे वाचन केले. प्रा. ज. रा. फणसळकर यांनी कलावंताचा वि. सा. संघातर्फे सत्कार केला.

८. शाखा वृत्त

८.१ अचलपूर (परतवाडा)

"माझा व्यवसाय आणि त्यातील सुख-दुःखे" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यात सर्वश्री एम. पी. देशमुख, रामरतन गुप्ता बिसमिल्ला खान आणि पार्डीकर यांनी भाग घेतला.

श्री. दातार यांच्या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मधुकरराव आष्टीकर, अध्यक्ष वि. सा. संघ यांचे हस्ते झाले.

८.२ वरूड

दि. १६–६–७९ ला डॉ. वसंतराव वऱ्हाडपांडे यांचे "महात्मा फुले, वाङमय व कार्य" या विषयावर व्याख्यान झाले.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

१९७८–१९७९ ह्या वर्षाचे कार्यवृत्त

(१ एप्रिल १९७८ ते ३१ मार्च १९७९)

वि. सा. संघाच्या सन्माननीय सदस्यांना हे कार्यवृत्त सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. आपल्या प्रेमळ प्रेरणेने आणि सहानुभूतिपूर्वं सहकार्याने गतवर्षी विविध कला व साहित्य समित्यांनी जे कार्य केले त्याचा तारीखवार व खुलासेवार तपशील गतवर्षीच्या युगवाणीच्या सहा अंकांतून आपल्या अवलोकनार्थ सादर केलेला आहेच. त्याची आपण अतीव आपुलकीने नोंद घेतलेली असेलच.

भूतपूर्व कार्यकारिणी सदस्य श्री. गो. के. केळकर यानी वि. सा. संघाविरुद्ध केलेल्या दाव्यात काहीच अर्थ नाही असा निकाल कोर्टाने दिला आणि खर्च त्यच्यावर बसविला. परंतु यामुळे कार्यात थोडी फार खीळ पडली व संस्थेला अनाठायी खर्च करावा लागला.

सभासद संख्या

उपकर्ते ९, आश्रयदाते ३, सहायक १, हितचिंतक २, आजीव सदस्य ३२०, साधारण सभासद. २४७७, केवळ युगवाणी वर्गणीदार ११९.

निधन पावलेल्या व कमी झालेल्या सभासदांची घट वजा जाता वर्षा अखेरची ही संख्या आहे.

शाखा सभा

अकोला, अकोट, अमरावती, अचलपूर (परतवाडा), उमरखेड खामगाव, गोंदिया, चंद्रपूर, चिखली, तुमसर, दिग्रस, दारव्हा, नरखेड, नवरगाव, नागभीड, नेरपरसोपंत, पांढरकवडा, पुलगाव, ब्रम्हपूरी, भंडारा, मूर्तिजापूर, यवतमाळ, लाखनी, वरुड, वणी, वर्धा, वाशीम, सावनेर या ठिकाणी वि. सा. संघाच्या शाखा सभा कार्य करीत आहेत. विशेष म्हणजे वणी व खामगाव या शाखा सभांचे या वर्षात रौप्य महोत्सव साजरे झाले.

संलग्न संस्था

रंजन कला मंदिर, नागपूर व सुभाष मंडळ, नागपूर

सभा

या वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण ६ सभा झाल्या. यापैकी तीन सभा बाहेर गावी म्हणजे अकोला, भंडारा व चंद्रपूर येथे झाल्या. वार्षिक साधारण सभा ३० जुलै, ७८ ला झाली व त्यात १९७८–७९ चा अर्थसंकल्प संमत झाला.

विश्वस्तांची सभा दि. १८–९–७८ ला बोलाविलेली होती परंतु ती स्थगित झाली. महत्वा काही कार्य नसल्याने सभा नंतर झाली नाही.

मराठी साहित्य महामंडळाच्या सभा हैद्राबाद, चंद्रपूर (दोनदा) येथे झाल्या. मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय सध्या नागपूरला वि. सा. संघ या घटक संस्थेकडे आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दि. ५, ६, ७ जाने., १९७९ ला चंद्रपूर येथे प्रा. वामनराव चोरघडे यांचे अध्यक्षतेखाली झाले

श्रद्धांजली

प्रा. ना. सी. फडके श्री. वि. द. घाटे, डॉ. ग. ना. वानखेडे, श्री. अनिल वादेकर, श्री. श्रीपाद शंकर नवरे, श्री. अनंतराव शेवडे , साहित्यिक तसेच संस्थेचे आजीव सदस्य डॉ. रा. नि. डांगे, डॉ. म. या. देव, सौ. अनुसयाबाई वाडेगांवकर, श्री. के. के. ठाकूर ह्यांना वि. सा. संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संघाचा वर्धापन दिन :

मकर संक्रांतीच्या शुभ दिनी दि. १४ जाने., ७९ वि. सा. संघाचा ५६ वा वर्धापन दिन साजरा झाला. त्या प्रसंगी मराठी विषयात पी. एच्. डी. मिळालेल्यांचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. साहित्याचार्य पदवी मिळाल्याबद्दल पारितोषिक देण्यात आले. रात्री संगीताचा कार्यक्रम झाला. त्यानिमित्त आदल्या दिवशी कथाकथनाचा बहारदार कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी 'तरुण भारता'चे संपादक आमदार श्री. मा. गो. वैद्य होते.

नैमित्तिक कार्यक्रम

नेहमीप्रमाणे १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिन २ ऑक्टोबरला गांधी जयंती व २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन साजरे झाले.

मान्यवर व्यक्तींच्या भेटी

माजी ऊर्जामंत्री श्री. जवाहरलालजी दर्डा, प्राचार्य राम शेवाळ कर, माजी शिक्षण मंत्री डॉ. बळीराम हिरे, महाराष्ट्रीय महिला जादुगार कु. मंदाकिनी जाधव (मेरीगोल्ड) महाराष्ट्र राज्य आरोग्य मंत्री श्री. गाढेकर, डॉ. शं. गो. तुळपुळे महाराष्ट्र राज्याचे माजी सभापती वि. सा. पागे, बेळगावचे उद्योगपती श्री. बी. एन. गोगटे यांनी वि. सा. संघाला भेट दिली. त्याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला.

स्मृतिदिन, जयंती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, नाना जोग स्मृति दिन, श्री. शिवछत्रपती शिवाजी जयंती, नि. ब. भवाळकर जन्म शताब्दी दिन, कवि भूषण ब. ग. उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांचा प्रथम स्मृति-दिन, साने गुरुजी स्मृतिदिन, टिळक पुण्यतिथी, आचार्य प्र. के. अत्रे जन्मदिन, कवीवर्य 'बी' पुण्यतिथी, गांधी जयंती, वि. रा. हंवर्डे स्मृतिदिन, ग. त्र्यं. माडखोलकर स्मृतिदिन, डॉ. बाबा साहेब आंबेडकर निर्वाण दिन, ग. दि. माडगुळकर प्रथम पुण्यतिथी, राम गणेश गडकरी स्मृतिदिन, महात्मा गांधी पुण्यतिथी, बा. सी. मर्ढेकर स्मृतिदिन, माडगुळकर प्रथम पुण्यतिथी, राम गणेश गडकरी स्मृतिदिन, महात्मागांधी पुण्यतिथी, बा. सी. मर्ढेकर स्मृति दिन पाळण्यात आले. त्याप्रसंगी उचित कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

सांस्कृतिक कार्यक्रम

इंग्रजी कवी श्री. निसिम इझेकेल यांचे व्याख्यान, तीन कवी एक समीक्षक, मेजर आठल्ये यांचा 'प्रवासी' हा एक नाट्यप्रयोग, आणि महिला विभागातर्फे 'साहित्याचे नव प्रवाह', श्रीमती विद्या बाळ यांची

स्त्रियांच्या समस्या 'प्रचलित विनोदी वाङ्मय आणि त्याची फलश्रुती' इत्यादी विषयांवर चर्चा झाल्या. गेल्या काही वर्षातील 'साहित्यातील घडामोडी' ह्या विषयावर परिसंवाद, श्री. श्री. रा. टिकेकर ह्यांचे 'अहिल्याबाई होळकर' या विषयावर व्याख्यान स्थानिक कवींचा कोजागिरीनिमित्त कविता वाचनाचा कार्यक्रम, कोल्हापूरचे गायक अॅड. न. वि. जोशी यांचे 'वृत्त, जाती, छंद' ह्या विषयांवर प्रात्यक्षिकासह व्याख्यान, साहित्य अकादमीच्या सदस्यांशी साहित्यविषयक चर्चा, नवोदित कवींचे संमेलन. अ. भा. म. सा. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. वामनराव चोरघडे यांचा सत्कार आणि कु. वसुधा मोडक व प्रा. घोंगे यांची नारदीय कीर्तने झाली. कै. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या तैल चित्राचे अनावरण डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे हस्ते व त्या प्रसंगी समयोचीत भाषणे.

गणेश व्याख्यानमाला— प्रा. श्रीराम पुजारी, सोलापूर यांचे 'भारतीय संगीताची वाटचाल' आणि 'संगीतातील समस्या' या विषयावर भाषणे झाली.

वेहरे व्याख्यानमाला— औरंगाबादचे प्रा. प्रभाकर मांडे यांची 'मराठी लोक साहित्याचे स्वरूप व विश्लेषण' या विषयावर व्याख्याने झाली.

विदर्भ साहित्य संघाचे ३३ वे साहित्य संमेलन भंडारा येथे दि. ४ व ५ जून, १९७८ ला झाले. प्राचार्य राम शेवाळकर हे संमेलनाध्यक्ष होते व माजी उपमुख्यमंत्री ना. ना. के. तिरपुडे हे उद्घाटक होते.

न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा अकोला शाखासभेतर्फे रा. ल. तोष्णीवाल महाविद्यालयात घेण्यात आल्या. वादविवादाचा विषय "सांसदीय लोकशाही विकसनशील देशाला उपयुक्त नाही" हा होता. स्पर्धेचे संचालन प्रा. मांडवगणे यांनी केले.

खांडेकर पारितोषिक— महाराष्ट्रातील सहा विद्यापीठांतून स्नातक (B. A.) परीक्षेत मराठी विषयात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १२५।- प्रमाणे खांडेकर निधीतून रोख पारितोषिके देण्यात आली.

ग्रंथ प्रकाशन योजना— या योजनेच्या अंतर्गत "समग्र बजावा प्रधान" हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतिमंडळाकडे अनुदानासाठी पाठविण्यात आला.

प्रातिनिधिक लघु कथांचा संग्रह प्रकाशित करण्याची योजना कार्यान्वित झाली आहे.

चित्रकला समिति

'बसोली' तर्फे बाल चित्रकारांचे चित्र प्रदर्शन, बाल चित्रकार अभय पुराणिक याच्या चित्रांचे प्रदर्शन श्री. मोरघडे यांच्या तैल चित्रांचे प्रदर्शन, भरविण्यात आले. विद्यार्थ्यांना पोर्ट्रेटपेंटिंगचे शिक्षण देण्याचे दृष्टीने वर्ग चालविण्यात आले. भारतीय शिक्षण मंडळाच्या नवयुग विद्यालय हनुमाननगर या संस्थेतर्फे बाल विद्यार्थ्यांचे चित्र प्रदर्शन, श्री. डिखोळे यांचे 'तैल' या माध्यमांतून लँडस्केपचे व चित्रकार धनंजय वर्मा यांनी पोर्ट्रेटचे प्रात्यक्षिक करून दाखविले, कै. नलिनी जतकर यांचे स्मरणार्थ शालेय विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. ह्या स्पर्धेत १५ शाळांनी भाग घेतला.

नाट्यसमिती

आनंदवन वरोरा तर्फे उघडण्यात आलेल्या 'शांतिवन' ह्या केन्द्रात उद्घाटन प्रसंगी 'हंगर स्ट्राईक' ही एकांकिका सादर करण्यात आली. महिला एकांकिका स्पर्धा मध्ये ११ संस्थांनी भाग घेतला, घर अंगणच्या अंतर्गत 'पोस्टमार्टम' नवप्रभात रामनगर या संस्थेतर्फे, 'भाजी पाव व रहिम' ही एकांकिका मेकॅनिक यंग ग्रुप तर्फे, 'यमाचा दरबार' ही एकांकिका स्वानंद ह्या संस्थे तर्फे सादर करण्यात आल्या.

विश्वस्तांची सभा दि. १८–९–७८ ला बोलाविलेली होती परंतु ती स्थगित झाली. महत्वाचे काही कार्य नसल्याने सभा नंतर झाली नाही.

मराठी साहित्य महामंडळाच्या सभा हैद्राबाद, चंद्रपूर (दोनदा) येथे झाल्या. मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय सध्या नागपूरला वि. सा. संघ या घटक संस्थेकडे आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दि. ५, ६, ७ जाने., १९७९ ला चंद्रपूर येथे प्रा. वामनराव चोरघडे यांचे अध्यक्षतेखाली झाले.

श्रद्धांजली

प्रा. ना. सी. फडके श्री. वि. द. घाटे, डॉ. ग. ना. वानखेडे, श्री. अनिल वादेकर, श्री. श्रीपाद शंकर नवरे, श्री. अनंतराव शेवडे, साहित्यिक तसेच संस्थेचे आजीव सदस्य डॉ. रा. नि. डांगे, डॉ. म. या. देव, सौ. अनुसयाबाई वाडेगांवकर, श्री. के. के. ठाकूर ह्यांना वि. सा. संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संघाचा वर्धापन दिन

मकर संक्रांतीच्या शुभ दिनी दि. १४ जाने., ७९ वि. सा. संघाचा ५६ वा वर्धापन दिन साजरा झाला. त्या प्रसंगी मराठी विषयात पी. एच्. डी. मिळालेल्यांचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. साहित्याचार्य पदवी मिळाल्याबद्दल पारितोषिक देण्यात आले. रात्री संगीताचा कार्यक्रम झाला. त्यानिमित्त आदल्या दिवशी कथाकथनाचा बहारदार कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी 'तरुण भारता'चे संपादक आमदार श्री. मा. गो. वैद्य होते.

नैमित्तिक कार्यक्रम

नेहमीप्रमाणे १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिन २ आक्टोबरला गांधी जयंती व २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन साजरे झाले.

मान्यवर व्यक्तींच्या भेटी

माजी ऊर्जामंत्री श्री. जवाहरलालजी दर्डा, प्राचार्य राम शेवाळकर, माजी शिक्षण मंत्री डॉ. बळीराम हिरे, महाराष्ट्रीय महिला जादुगार कु. मंदाकिनी जाधव (मेरीगोल्ड) महाराष्ट्र राज्य आरोग्य मंत्री श्री. गाढेकर, डॉ. शं. गो. तुळपुळे महाराष्ट्र राज्याचे माजी सभापती वि. सा. पागे, बेळगावचे उद्योगपती श्री. वी. एन. गोगटे यांनी वि. सा. संघाला भेट दिली. त्याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला.

स्मृतिदिन, जयंती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, नाना जोग स्मृति दिन, श्री. शिवछत्रपती शिवाजी जयंती, नि. व. भवाळकर जन्म शताब्दी दिन, कवि भूषण ब. ग. उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांचा प्रथम स्मृति-दिन, साने गुरुजी स्मृतिदिन, टिळक पुण्यतिथी, आचार्य प्र. के. अत्रे जन्मदिन, कवीवर्य 'बी' पुण्यतिथी, गांधी जयंती, वि. रा. हंबर्डे स्मृतिदिन, ग. त्र्यं. माडखोलकर स्मृतिदिन, डॉ. बाबा साहेब आंबेडकर निर्वाण दिन, ग. दि. माडगुळकर प्रथम पुण्यतिथी, राम गणेश गडकरी स्मृतिदिन, महात्मा गांधी पुण्यतिथी, बा. सी. मर्ढेकर स्मृतिदिन, माडगुळकर प्रथम पुण्यतिथी, राम गणेश गडकरी स्मृतिदिन, महात्मागांधी पुण्यतिथी, बा. सी. मर्ढेकर स्मृति दिन पाळण्यात आले. त्याप्रसंगी उचित कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

सांस्कृतिक कार्यक्रम

इंग्रजी कवी श्री. निसिम इझेकेल यांचे व्याख्यान, तीन कवी एक समीक्षक, मेजर आठल्ये यांचा 'प्रवासी' हा एक नाटचप्रयोग, आणि महिला विभागातर्फे 'साहित्याचे नव प्रवाह', श्रीमती विद्या बाळ यांची

अनुक्रमणिका

स्त्रियांच्या समस्या 'प्रचलित विनोदी वाङमय आणि त्याची फलश्रुती' इत्यादी विषयांवर चर्चा झाल्या. गेल्या काही वर्षातील 'साहित्यातील घडामोडी' ह्या विषयावर परिसंवाद, श्री. श्री. रा. टिकेकर ह्यांचे 'अहिल्याबाई होळकर' या विषयावर व्याख्यान स्थानिक कवींचा कोजागिरीनिमित्त कविता वाचनाचा कार्यक्रम, कोल्हापूरचे गायक अॅड. न. वि. जोशी यांचे 'वृत्त, जाती, छंद' ह्या विषयांवर प्रात्यक्षिकासह व्याख्यान, साहित्य अकादमीच्या सदस्यांशी साहित्यविषयक चर्चा, नवोदित कवींचे संमेलन. अ. भा. म. सा. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. वामनराव चोरघडे यांचा सत्कार आणि कु. वसुधा मोडक व प्रा. घोंगे यांची नारदीय कीर्तने झाली. कै. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या तैल चित्राचे अनावरण डॉ. ग. श्यं. देशपांडे यांचे हस्ते व त्या प्रसंगी समयोचीत भाषणे.

गणेश व्याख्यानमाला— प्रा. श्रीराम पुजारी, सोलापूर यांचे 'भारतीय संगीताची वाटचाल' आणि 'संगीतातील समस्या' या विषयावर भाषणे झाली.

बेहरे व्याख्यानमाला— औरंगाबादचे प्रा. प्रभाकर मांडे यांची 'मराठी लोक साहित्याचे स्वरूप व विश्लेषण' या विषयावर व्याख्याने झाली.

विदर्भ साहित्य संघाचे ३३ वे साहित्य संमेलन भंडारा येथे दि. ४ व ५ जून, १९७८ ला झाले. प्राचार्य राम शेवाळकर हे संमेलनाध्यक्ष होते व माजी उपमुख्यमंत्री ना. ना. के. तिरपुडे हे उद्घाटक होते.

न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा अकोला शाखासभेतर्फे रा. ल. तोष्णीवाल महाविद्यालयात घेण्यात आल्या. वादविवादाचा विषय "सांसदीय लोकशाही विकसनशील देशाला उपयुक्त नाही" हा होता. स्पर्धेचे संचालन प्रा. मांडवगणे यांनी केले.

खांडेकर पारितोषिक— महाराष्ट्रातील सहा विद्यापीठांतून स्नातक (B. A.) परीक्षेत मराठी विषयात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १२५/- प्रमाणे खांडेकर निधीतून रोख पारितोषिके देण्यात आली.

ग्रंथ प्रकाशन योजना— या योजनेच्या अंतर्गत "समग्र बजावा प्रधान" हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतिमंडळाकडे अनुदानासाठी पाठविण्यात आला.

प्रातिनिधिक लघु कथांचा संग्रह प्रकाशित करण्याची योजना कार्यान्वित झाली आहे.

चित्रकला समिती

'वसोली' तर्फे बाल चित्रकारांचे चित्र प्रदर्शन, बाल चित्रकार अभय पुराणिक याच्या चित्रांचे प्रदर्शन श्री. मोरघडे यांच्या तैल चित्रांचे प्रदर्शन, भरविण्यात आले. विद्यार्थ्यांना पोर्ट्रेटपेंटिंगचे शिक्षण देण्याचे दृष्टीने वर्ग चालविण्यात आले. भारतीय शिक्षण मंडळाच्या नवयुग विद्यालय हनुमाननगर या संस्थेतर्फे बाल विद्यार्थ्यांचे चित्र प्रदर्शन, श्री. डिखोळे यांचे 'तैल' या माध्यमांतून लँडस्केपचे व चित्रकार धनंजय वर्मा यांनी पोर्ट्रेटचे प्रात्यक्षिक करून दाखविले, कै. नलिनी जतकर यांचे स्मरणार्थ शालेय विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. ह्या स्पर्धेत १५ शाळांनी भाग घेतला.

नाट्यसमिती

आनंदवन वरोरा तर्फे उघडण्यात आलेल्या 'शांतिवन' ह्या केन्द्रात उद्घाटन प्रसंगी 'हंगर स्ट्राईक' ही एकांकिका सादर करण्यात आली. महिला एकांकिका स्पर्धा मध्ये ११ संस्थांनी भाग घेतला, घर अंगणच्या अंतर्गत 'पोस्टमार्टम' नवप्रभात रामनगर या संस्थेतर्फे, 'भाजी पाव व रहिम' ही एकांकिका मेकॅनिक यंग ग्रुप तर्फे, 'यमाचा दरबार' ही एकांकिका स्वानंद ह्या संस्थे तर्फे सादर करण्यात आल्या.

श्री. बळवंत लाभकाणे लिखीत 'उमा' नाटकाचा प्रयोग संस्थेतर्फे करण्यात आला. वि. सा. संघातर्फे बालनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यात १२ संस्थांनी भाग घेतला.

दि. ५–११–७८ ला रंगभूमि दिन साजरा झाला. कै. डावरे एकांकिका स्पर्धेत ३० एकांकिका सादर करण्यात आल्या.

श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालय

एम. ए. मराठी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले गेले. या मार्गदर्शनामुळे १९७८ मध्ये एम. ए. मराठी परीक्षेत अपूर्व यश प्राप्त केल्याबद्दल नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. काळमेघ यांच्या हस्ते ह्या मार्गदर्शनाचा लाभ घेणाऱ्या गुणवत्ता यादीत स्थान पटकावणाऱ्या सौ. कमल पांढरीपांडे, कु. चारुलता फत्तेखानी, श्री. रमेश कांबळे व नीलिमा दाणी यांचा सत्कार करण्यात आला. या शिवाय ग्रंथप्रदर्शने भरविण्यात आली.

परीक्षा समिती

१९७८–७९ मध्ये एकूण ७६ केन्द्रांतून ४२०३ विद्यार्थी परीक्षेला बसले. या समितीचे कार्य दिवसेंदिवस प्रगतिपथावर आहे.

संकल्पित योजना

बालक वर्षानिमित्त वि. सा. संघातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी बाल कथा कथन स्पर्धा, बाल चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, बाल वाङ्मय प्रकाशन योजना, बाल नाट्य स्पर्धा घेतल्या जातील. याकरिता देणग्या मिळविण्याचे प्रयत्न होत आहेत.

या वर्षी नव्याने विनोदी एकांकिका स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

युगवाणी

या वर्षी युगवाणीचे सहा जोड–अंक प्रकाशित झालेत.

भेटीदाखल व परीक्षणार्थ आलेल्या ग्रंथांची युगवाणी मध्ये वेळोवेळी पोच देण्यात आली आहेच.

दैनिके— युगवाणीला भेटीदाखल खालील नियतकालिके येतात. तरूण भारत, लोकमत, महासागर, नागपूर पत्रिका, नागपूर टाईम्स्, हितवाद.

साप्ताहिके— साधना, विवेक, आर्वी टाईम्स्, मराठवाडा, तरुण भारत, पुणे, प्रज्वलंत, सोबत, लोकराज्य, नागरिक जीवन.

पाक्षिके— रुद्रवाणी, सोव्हिएट देश

मासिके—लोकशिक्षण, वाचनालय, कुमार, मराठी विज्ञान परिषद, किर्लोस्कर, पूर्वा, प्रतिष्ठान, प्रसाद, सत्यकथा, अमृत, कविता, जीवन विकार, स्पॅन, पुरुषार्थ, तत्वज्ञान, महानुभव, एकता, ललित, मायमराठी संतकृपा, ज्ञानोदय, प्रेरणा, तात्पर्य, पंचधारा, अरुंधती, सन्मती, बायजा, भरतशास्त्र, इये मराठीचे नगरी, अनुष्टुभ, सुगावा, नवभारत.

द्वैमासिक— अस्मितादर्श, महानुभाव, अभिरुची.

त्रैमासिक— प्रेरणा, मराठी संशोधन पत्रिका, मराठी साहित्य पत्रिका, पंचधारा,

दैनिक महाराष्ट्र टाईम्स् विकत घेतला जातो.

धनवटे रंग मंदिर

या वर्षी रंगमंदिराच्या वापराबद्दल खालील उत्पन्न झाले.

	प्रयोग	उत्पन्न रु. पै.
(१) नाटयप्रयोग	१११	४१,५००-००
(२) बाल नाटय	११	१,७६१-००
(३) सांस्कृतिक कार्यक्रम (आर्केस्ट्रा, गायन आदी)	८५	३९,३५०-००
(४) सभा, सम्मेलन व इतर	७०	९,८७५-००
(५) जादूचे प्रयोग	१२	५,९००-००
	एकूण	९८,३८६-००

धनवटे रंग मंदिरातील कॅंटीन, पानठेला, सायकल स्टॅंड आदीकरिता रीतसर निविदा मागवून ठेका एकूण रु. ६,६६६-०० ला देण्यात आला.

धनवटे रंगमंदिर वातानुकुल करण्याची योजना कार्यान्वित झाली आहे. बहुतेक काम पूर्ण होत आले आहे. सुमारे दोन महिन्यांत हे यंत्र चालू होईल अशी अपेक्षा आहे.

अनुदान

श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला शासनाच्या ग्रंथालय विभागातर्फे रु. २५००-००.

